

क्रांतीवीर नानासाहेब पुरोहित

# माणूस

१८ ऑगस्ट १९७३

५० पैसे

श्री. ग. माजगावकर

१८ ऑगस्ट १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : बारावा




१० जुलै, ७३

◻ ११ ऑगस्टचा अंक हातात पडताच त्यातील आपले संपादकीय वाचले. सडेतोड विचारसरणीचा आपला 'दोन दिवस' शिवसेनेचे हा लेख खरोखरच मनापासून आवडला. 'आपले पण हेच मत होते' असे लेख वाचल्यावर वाटले (खरे तर ते लेख वाचल्यानंतर झाले!) थोडक्यात, पण मुद्देसूद असा लेख बऱ्याच दिवसात वाचावयास मिळाला नव्हता. आपला लेख वाचल्यावर चांगला लेख वाचल्याचे समाधान लाभले. कोणाचेही शंका निरसन अथवा मत-परिवर्तन होईल इतका लेख सुबोध, स्वच्छ वाटला. आपले त्रिवार अभिनंदन! 'नाईकांचा शिकारखाना तसेच 'शिवसेनेचा पिंजऱ्यातला वाघ' ह्या कोटया खरोखरच उत्तम आहेत. अशीच शैलीदार संपादकीय माणूसमध्ये प्रसिद्ध होवोत.

राजू जयवंत, मुंबई

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# चर्मकार समाजातील पहिला आय. ए. एस. युवक

## जगन्नाथ डांगे

अखिल भारतीय स्पर्धात्मक परीक्षात मराठी भाषिक विद्यार्थी मागे पडतात अशी नेहमीचीच तक्रार आहे. ऑक्टोबर १९७२ मध्ये झालेल्या आय. ए. एस. परीक्षेतही मोजकेच मराठी विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये मूळचे अकोला जिल्ह्यातले परंतु शिक्षणानिमित्त पुण्यात राहिलेले श्री. जगन्नाथ पंढरी डांगे यांचा समावेश आहे. श्री. डांगे यांचे पदव्युत्तर शिक्षण (मास्टर ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन) पुण्यात झाले व त्यांनी पुणे विद्यापीठातील आय. ए. एस कोचिंग सेंटरचाही लाभ घेतला होता. महाराष्ट्राच्या चर्मकार समाजातून आय. ए. एस होणारे डांगे हे पहिलेच विद्यार्थी आहेत. अर्थात ते अनुसूचित जातींसाठी असलेल्या राखीव जागांतून निवडले गेलेले नाहीत हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. त्यांचा एक वर्गबंधु या नात्याने मला त्यांच्या या अपूर्व यशाबद्दल फार अभिमान वाटतो. पुण्यात अभ्यास करून त्यांनी हे यश मिळवले ही गोष्ट पुणे शहरालाही अत्यंत भूषणावहच आहे

श्री. डांगे हे विदर्भातील खेळदेशपांडे (ता. अकोट, जि. अकोला) या गावचे रहिवासी. त्यांचे वडील तेथेच शेती करतात. त्यांची स्वतःची शेती त्यांच्या आजोबांच्या काळात सावकाराकडे गहाण पडली. व्याजाचा दर अर्थातच फार जाचक होता. त्यामुळे कर्ज फेडता येईना व म्हणून बरीचशी शेती सावकाराच्या घशात गेली. वडील सुरुवातीस चांभारकीचा पारंपारिक व्यवसाय करीत, पण त्यात भागेनासे झाल्याने आता स्वतःच्या तुटपुंज्या शेतीबरोबरच

शेतमजूरीही करावी लागते. डांगे यांना एकूण चार भाऊ व एक बहीण. पैकी दोघे मोठे बंधू शिक्षण फारसे झाले नसल्याने शेती पाहतात व मजुरी करतात. दोघे धाकटे बंधू व बहीण शिकत आहेत.

डांगे यांच्या आईच्या घराण्यात शिक्षणाचा बराच प्रसार झालेला आहे. त्यांचे एक मामा प्राथमिक शिक्षक आहेत. मामाचा मुलगा बुलढाण्याच्या कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक आहे. तसेच दुसऱ्या मामाचा मुलगा अमेरिकेत शिकागो येथे पदव्युत्तर शिक्षणासाठी गेलेला आहे. त्यांचा एक मावसभाऊ माध्यमिक शिक्षक व समाजसेवक आहे. त्यांच्या मामांचे वास्तव्य तालुक्याच्या ठिकाणी असल्याने व त्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याने त्यांच्या घराण्याची बरीच शैक्षणिक प्रगती झाली आहे. डांगे यांनाही त्यांच्या आईने सतत पाठिंबा व प्रोत्साहन दिल्याने त्यांना शिक्षण घेण्यास प्रेरणा मिळाली, असे ते अभिमानाने सांगतात. त्यांच्या घरातील वातावरणामुळे शिक्षणात कधीच आडकाठी आली नाही. तसेच प्रथमपासून डांगे यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळत असल्याने कुटुंबावर आर्थिक बोजाही कधी पडला नाही.

डांगे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांच्या खेळदेशपांडे गावीच झाले. त्यांच्या गावी माध्यमिक शाळा असून त्यात बहुसंख्येने सवर्ण हिंदू विद्यार्थी होते. नियमित अभ्यास व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे त्यांचा वर्गात सतत पहिला क्रमांक येत असे. शालेय गुणवत्ता शिष्यवृत्ती त्यांनी अर्थातच मिळवली व ती पुढे कायम राखली. विदर्भामध्ये नववीपासून ऐच्छिक विषय निवडण्याची सोय आहे त्याप्रमाणे डांगे यांना मेडिकलकडे जाण्यासाठी शास्त्राचे विषय घेण्याची इच्छा होती. परंतु हे विषय शिकवण्याची त्यांच्या गावी सोय नसल्याने व परगावी जाऊन राहण्याची ऐपत नसल्याने त्यांनी वाणिज्य शाखेची निवड केली. पुढे १९६७ साली ते शालांत परीक्षेत ८०% गुण मिळवून नागपूर विभागात वाणिज्य शाखेत सर्वप्रथम आले. त्यांना राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते अकोल्याच्या एलआरटी वाणिज्य महाविद्यालयात दाखल झाले. तेथून पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत पहिला क्रमांक, प्रथम व द्वितीय वर्षात पहिला वर्ग व शेवटी बी. कॉम परीक्षेत नागपूर विद्यापीठात पहिल्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांना एक सुवर्णपदक व विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे पारितोषिक मिळाले.

आय. ए. एस. परीक्षेला बसण्याची प्रेरणा कशी व कधी मिळाली असे विचारता त्यांनी सांगितले, की पदवीपूर्व वर्गात असताना उत्पन्नाचा व जातीचा दाखला मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या कचेरीत चारपाच हेलपाटे मारावे लागले, चपराशांना चिरिमिरी द्यावी लागली, त्याचवेळी शासनामध्ये बडे अधिकारी व्हावे अशी

इच्छा निर्माण झाली. अर्थात त्यावेळी परीक्षेच्या स्वरूपाबद्दल काहीच कल्पना नसल्याने पुढील दोन वर्षात खास आय. ए. एस.साठी काही तयारी केली नाही. १९७० साली अकोल्याच्या त्यांच्याच महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती शामला बालसुब्रह्मण्यम् आय. ए. एस. परीक्षेत भारतात सर्वप्रथम आल्या. त्यांच्या सत्काराच्या प्रसंगी डांगे यांनी स्वागतपर भाषण केले होते. त्यानंतर श्रीमती बालसुब्रमण्यम् व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांना या परीक्षेस बसण्याचे सुचवले. श्रीमती बालसुब्रह्मण्यम् यांनी परीक्षेची सर्व माहिती देऊन व बसल्यास नक्की यश मिळेल असा विश्वास व्यक्त करून उत्साह वृद्धिगत केला.

त्यामुळे डांगे यांनी बी. कॉमच्या अखेरच्या वर्षास असताना आय. ए.एस. च्या दृष्टीने खास तयारी सुरू केली. इंग्रजीचा अभ्यास म्हणून निबंध, भाषांतराचा सराव सुरू केला. तसेच वर्तमानपत्रे नियमित वाचून सामान्यज्ञानात भर टाकली. तसेच कायद्याचाही थोडाफार अभ्यास सुरू केला. या कामी त्यांना त्यांच्या इंग्रजीच्या व कायद्याच्या प्राध्यापकांची खूप मदत झाली.

बी. कॉम झाल्यानंतर डांगे यांचा मुंबई येथील जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये प्रवेश घेण्याचा विचार होता. कारण त्यांच्या परिचयाचा एकजण तेथून पदवी घेऊन चांगल्या हुद्द्यावर लागला होता. परंतु विद्यापीठाचा निकाल लागेपर्यंत तिकडची अर्ज करण्याची अखेरची तारीख उलटून गेली होती त्यामुळे तो विचार रद्द करावा लागला.

पुढे त्यांनी जिल्ह्यातील काही प्रतिष्ठित व्यक्तींची गाठ घेऊन त्यांच्यातर्फे पुण्याच्या एम. बी. ए. (मास्टर ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन) या अभ्यासक्रमाची माहिती मिळवली व अर्ज करून गुणवत्तेवर प्रवेश मिळवला. त्यानंतर लगेचच पुणे विद्यापीठाच्या आय.ए.एस. कोचिंगमध्येही त्यांची निवड झाली.

एम. बी. ए. ला असताना डांगे यांना दोन ठिकाणाहून चांगल्या नोकऱ्यांसाठी बोलावणे आले होते परंतु त्या त्यांनी स्वीकारल्या नाहीत व शिक्षण पुढे चालू ठेवले.

त्यांच्या आय. ए. एस. परीक्षेतील यशाचे मोठे श्रेय ते एम. बी. ए. च्या अभ्यासक्रमाला देतात. त्यांच्या मते या अभ्यासक्रमामुळे व्यक्तिमत्त्वाचा उत्तम विकास होत असल्याने मुख्यत्वेकरून आय. ए. एस. च्या मुलाखतीसाठी त्याचा फार उपयोग होतो. त्याचप्रमाणे आय. ए. एस. परीक्षेत Originality ला महत्त्व असल्याने प्रत्येक गोष्टीवर स्वतः बारकाईने विचार करण्याची सवय करून घ्यावी लागते व त्यासाठीही एम. बी. ए. च्या विषयांच्या अभ्यासाचा फायदा झाला. डांगे यांनी अभ्यासात वाचन, मनन व चिंतन यावर भर दिला. आवश्यक तेवढेच लेखन केले. तसेच यश मिळवायचेच या निर्धाराने परिश्रम केल्याने त्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादीतून निवड झाली, अनुसूचित जातीं-

साठी असलेल्या राखीव जागांचा उपयोग करून घेण्याची गरजच त्यांना भासली नाही.

पुण्यातील शैक्षणिक वातावरणाबद्दल ते एकूण संतुष्ट वाटतात. पुणे विद्यापीठातील विद्यार्थीही त्यांना प्रागतिक विचारसरणीचे आढळले. अर्थात काही विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाविषयी शंका वाटते, हा राखीव जागांतूनच निवडला गेला असणार अशी त्यांची समजूत असल्याची तक्रार डांगे यांनी केली.

दलित समाजातील नागरिकांना मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे त्यांच्यातील होतकरू विद्यार्थ्यांची प्रगती होऊ शकत नाही अशी सर्वत्र परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर डांगे यांनी एक दलित विद्यार्थी या नात्याने आलेल्या काही अनुभवांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला.

डांगे यांच्या गावामध्ये अस्पृश्यता अजूनही पाळली जाते. मंदिरात जाऊ न देणे, विहिरीचे पाणी घेऊ न देणे, शेतातील पिके पळवणे, यासारखे प्रकार नेहमीच घडतात. परंतु तेथल्या हरिजन समाजातच एकीचा अभाव आहे. उच्चवर्गीयांकडून फूट पाडण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच हरिजन समाज आर्थिकदृष्टया फारच दुर्बल असल्याने तेथे दलितांची संघटित चळवळ उभी होऊ शकलेली नाही.

डांगे यांना आजवर व्यक्तिशः फारसा जाच सहन करावा लागलेला नाही. त्यांच्या गुणवत्तेमुळे त्यांना शाळेत नेहमीच चांगली वागणूक मिळत असे. प्रत्येक वेळी गुणवत्ता शिष्यवृत्त्या मिळाल्याने सवलती मिळवण्यासाठी अडचणीतून जावे लागले नाही. अर्थात काही कटु प्रसंगांना तोंड देण्याची त्यांच्यावर वेळ आली.

शाळेत असताना नवव्या वर्गाच्या स्नेहसंमेलनाचे वेळी झालेल्या भोजनाकरिता तिघा-चौघा दलित विद्यार्थ्यांसह डांगे यांना वेगळे बाहेर बसवण्यात आले. त्यावेळी ते जेवण न घेता उठून आले. मात्र तेव्हापासून त्यांना या प्रश्नाविषयी आत्यंतिक चीड निर्माण झाली.

अकोल्यात शिक्षणासाठी राहण्याकरिता त्यांना जागेची आवश्यकता होती. सर्व घरमालक जागा देण्याआधी जात विचारीत. त्यामुळे डांगे यांना जागा मिळेना व अपमानही गिळावा लागला. अखेर एका दलित घरमालकानेच त्यांना खोली दिली.

डांगे यांना पुण्यात मात्र कुठलाच वाईट अनुभव आला नाही, उलट विद्यार्थीमित्रांकडून बरेचदा मदतच झाली.

डांगे यांनी दलितांच्या चळवळीत मोजक्याच प्रसंगी भाग घेतलेला आहे. एकदा कॉलेजात असताना उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यांनी त्यांच्या गावी एका शिक्षकांच्या मदतीने मंदिरप्रवेशाचा कार्यक्रम आयोजित केला होता. पहिल्या खेपेस यश आले नाही कारण हरिजन समाजाकडूनच पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. पुढल्या वर्षी पुन्हा नेटाने प्रयत्न केल्याने समाजातील बऱ्याच नागरिकांचा पाठिंबा

मिळाला व मंदिरप्रवेशाचा बेत यशस्वी झाला.

डांगे यांच्या गावी हरिजन समाज बराच असूनही त्यांच्यापैकी फार थोडे विद्यार्थी एस. एस. सी. पर्यंत पोहोचतात. सध्या त्यांनी गावातील हरिजनांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्याचा परिणाम म्हणून प्राथमिक शाळेतील हरिजन विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.

अखेरीस डांगे यांच्या भविष्यातील योजनांसंबंधी त्यांना विचारले असता त्यांनी त्यांचा समाजासाठी व राष्ट्रासाठी झटून कार्य करण्याचा मानस व्यक्त केला.

गावातील दलित विद्यार्थ्यांना वर आणण्यासाठी त्यांना स्पर्धात्मक परीक्षांची माहिती देवून मार्गदर्शन करण्याचा त्यांचा विचार आहे. यासाठी मुद्दाम स्वतःचा काही वेळ देण्याची तसेच आर्थिक साहाय्य करण्याचीही त्यांची तयारी आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना निर्माण करण्यासाठीही ते प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या समाजाची उन्नती व्हावी यासाठी अधिकाराचा कायदेशीर वापर व दलितांना दिलेल्या सवलतींची काटेकोर अंमलबजावणी करण्याची दक्षता अशा दोन मार्गांनी ते स्वतःचा समाजाला उपयोग करून देणार आहेत.

त्यांच्या समाजातील काही व्यक्तींचा दैनिक वृत्तपत्र काढण्याचा विचार आहे त्याला सर्वतोपरी पाठिंबा मदत करण्याचे श्री. डांगे यांनी आश्वासन दिले आहे.

एक कार्यक्षम व कर्तव्यतत्पर प्रशासक होण्याची डांगे यांची महत्वाकांक्षा आहे. शासनाचे कार्य चोख रीतीने करूनच मी राष्ट्राची खऱ्या अर्थाने सेवा करू शकेन अशी त्यांची भूमिका आहे.

—दत्तात्रय देवरे


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

# बेचाळीसच्या तीन आठवणी

नानासाहेब गाडगीळ

## तारगाव पॅटर्न व महाराजांची गढी

तारगाव स्टेशनजवळ एके दिवशी रेल्वेच्या लोकांना पगारवाटप करणारी आगगाडी लुटून बारा-तेरा हजार रुपये नाथालाल, अप्पा लाड वगैरे लोकांनी हस्तगत केले. त्याचा वृत्तांत व ती रक्कम मध्यवर्ती कमिटीकडे पोहोचवली नाही अथवा त्याचा जमाखर्चही कळविला नाही. म्हणून देशभक्त अच्युतराव पटवर्धन यांचेकडून वरचेवर विचारणा होई. वरील दोन्ही लाडांना त्यावद्दल वारंवार विचारीत असता त्यांनी नाना पाटील (त्यावेळी त्यांना महाराज म्हणून संबोधित असत) ह्यांचेकडे ह्याबाबत विचारणा करावी असे सांगितले. नाना पाटलांची ते भूमिगत असता भेट घेण्याचे ठरवले. दिवस व वेळ नक्की झाली. मी सांगलीहून माधवनगर स्टेशनवर गेलो व तेथून सकाळच्या रेल्वेने किर्लोस्करवाडी स्टेशनवर उतरलो. मी स्टेशनात दिसताच झाडावरून शिट्या घालून मी आल्याची सूचना कार्यकर्त्यांना दिली गेली. मला नेण्यास एक कार्यकर्ता आला. त्याचे मागून काही अंतराने चालत चालत किर्लोस्करवाडीस गेलो. तिथून कुंडलला मला नेण्यात आले व एका घरात आणून सोडून तो कार्यकर्ता निघून गेला. थोडया वेळाने दुसरा कार्यकर्ता आला. व आपल्याबरोबर काही अंतर ठेवून चालण्यास सांगून तो पुढे व मी मागे अशा तऱ्हेने चालत चालत एका घरात शिरलो. तेथे नाना पाटील चारी बाजूस पोत्यांच्या पुरुषभर थप्पीमध्य एका सतरंजीवर वाट पहात बसले होते. जवळच रॉकेलचा एक मिणमिणीत दिवा लावला होता. मला पाहताच उभे राहून त्यांनी हार्दिक स्वागत केले व थोडा वेळ क्षेमकुशल, इकडच्या-तिकडच्या गप्पा व चळवळीच्या हकीकती बोलून झाल्यावर

मूळ मुद्यासंबंधी मी त्यांना प्रश्न केला. तेव्हा त्यांनी सांगितले की तुम्ही म्हणता ते बरोबर आहे पण आम्ही ते काम रेल्वेच्या गँगमननाच हाताशी धरून केले आहे. त्यामुळे त्यांना त्यामध्ये काही वाटा द्यावा लागला व काही रक्कम कुठे-कुठे कार्यकर्त्यांकडे विखुरली आहे ती जमा करून कळवितो. इतके बोलणे झाल्यावर मी उठून जावयास निघालो. इतक्यात बातमी आली की सर्व कुंडल गावास पोलिसांचा गराडा पडला आहे. व आता गावातून बाहेर जाणे अवघड आहे. तरी आज कुंडलला गावातच मुक्काम करावा लागेल. त्याप्रमाणे रात्रीपावेतो एक-दोन ठिकाणी हलवाहलवी झाल्यावर पहाटेच्या मेलने मी किर्लोस्करवाडी स्टेशनवरून सांगलीस परत आलो. ही हकीकत काही दिवसातच मुंबईस व मध्यवर्ती सरकारात चर्चिली जाऊ लागली व एक सिमला C. I. D. चा अति धूर्त, हुषार असा बापट नावाचा मनुष्य सांगली संस्थानात आला व सांगली पोलिसांकडे जाऊन श्री. भाऊराव गाडगीळ फौजदार यांना घेऊन माझेकडे आला व आडवळणाने इकडच्या-तिकडच्या गप्पा मारत-मारत, नाना पाटलांच्यासंबंधी बोलणी काढत. काही सुगावा लागतो का ते पहात होता. परंतु आम्हीही काही कच्च्या गुरूंचे चेले नव्हतो. जवळ जवळ तासभर बोलूनही त्यास काही थांगपत्ता लागला नाही. तसेच हात हलवत आभार मानून त्याने रजा घेतली. मागाहून श्री. भाऊराव गाडगीळ यांनी सांगितले की तुमच्या भेटीचा वृत्तांत ब्रिटीश सरकारातून आमचेकडे आला आहे व आमचीही स्वतंत्रपणे नोंद झालेली आहे. काही दिवसांनी चौकशी करताना असे कळले की ती रक्कम आता काही हाती येत नाही म्हणून मध्यवर्ती कमिटीने नाद सोडावा. त्या कालात नाना पाटलांची गाठ घेणे हे फार धोक्याचे काम होते. ब्रिटीश सरकारने त्यांना पकडून देणाऱ्यास फार मोठे इनाम लावले होते. तो एक ब्रिटीश सत्तेच्या प्रतिष्ठेचा विषय झाला होता. तसाच तो भूमिगत कार्यकर्त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. म्हणून काहीही करून सोयी-गैरसोयी सोसूनही नाना पाटलांना भूमिगत सुरक्षित ठेवणे हे मोठे जोखमीचे व महत्त्वाचे काम होऊन राहिले होते व ते अखेरपर्यंत पार पडले हे विशेष. ☐

# अंतराळात

जुन्या सांगलीत वैद्य सांभारे यांच्या मोठ्या वाड्यात समोरच श्रीगजाननाची भव्य मूर्ती, प्रचंड अशा प्रवेश द्वारातून आत जाताच उजवीकडे वळल्यावर थेट तिमजल्यावर घेऊन जाणारा लाकडी अरुंद जिना. तिथे कै. गुरुवर्य तारो यांचे वास्तव्य असे. श्री. भाऊसाहेब गाडगीळ व श्री. आण्णासाहेब गाडगीळ हे उभयता त्या ठिकाणी भूमीगत कार्यकर्त्यांची व्यवस्था पाहात. ह्या ठिकाणास त्यावेळी कार्यकर्त्यांमध्ये

अंतराळ, ही संज्ञा प्राप्त झाली होती. अशा ठिकाणी दे. भ. यशवंतरावजी चव्हाण, डॉक्टर सोवनी इतरही कार्यकर्ते रात्री अपरात्री अकस्मात येत व पहाटे उजाडण्यापूर्वी निघून जात. त्यांच्या जेवण्या-खाण्याची पैशा अडक्याची व साधनसामुग्रीची तरतूद इथून केली जाई.

असेच एकदा काही कार्यक्रमाकरीता डॉ. सोवनी यांना एक्स्प्लोझीव सामान खरेदी करावयाचे होते. चारपाचशे रुपयांची निकडीने गरज होती. म्हणून ते रात्री बारावाजता आले. माझ्या जवळ तर त्यावेळी तेवढी सोय नव्हती. त्यांना तर थांबायला सवड नव्हती. आता काय करावे अशा विचारात मी पडलो. इतक्यात माझे एक स्नेही श्री. कांतिलाल शाह याच्याकडे गेल्यास काम होईल ही कल्पना आली. त्यांना आधी निरोप पाठविला. काही खास काम आहे थोड्या वेळात मी येत आहे. अर्ध्याएक तासात मी त्यांचेकडे गेलो तेव्हा ते व त्यांचे वडील वाटच पाहात बसले होते. रीतीप्रमाणे आगत स्वागत होताच मी त्याना कामाची कल्पना दिली तर काय आश्चर्य त्यांनी मला आतील खोलीत नेले. तिथे असलेली. तिजोरी उघडली ती नोटांच्या थप्प्यांनी पुरेपूर भरलेली होती. तिकडे बोट दाखवून म्हणाले, लक्ष्मणराव तुम्हाला पाहिजे तेवढे पैसे तुमचे हातानी घ्या. हे दातृत्व व ही तयारी पाहून मी थक्क झालो. समाजामध्ये लढयाला सहानुभूती किती आहे हे अनुभवास आले. जरुरीपुरतेच चारपाचशे रुपये त्यांचेकडून घेतले पण सांगण्यास विसरलो नाही की पुन्हा पुढे केव्हा जरुर लागल्यास अवश्य येईन. त्या पिता-पुत्रांचे मनःपूर्वक आभार मानून व धन्यवाद देऊन बाहेर पडलो व डॉ. सोवनीची गरज पूर्ण केली. चळवळ जोवर जोरात होती तोवर पैशाची कधीच अडचण भासली नाही.

जेव्हा जेव्हा दे. भ. यशवंतरावजींची गाठ पडते तेव्हा तेव्हा अंतराळाचा उल्लेख ते आवर्जुन करतात. ◻

## पाठलाग

भर दुपारचा समय, ऊन म्हणजे मी म्हणत होते. सगळीकडे सराफ कट्यात शुकशुकाट होता. मी दुकानात काम करीत होतो. वसंतरावदादा पाटील जे धावतपळत आले ते एकदम आतील बाजूस खोलीत जाऊन बसले. हातात एक पिशवी होती. त्यात २।४ रिव्हाल्वर्स व पिस्तुले होती. घाईघाईने आल्यामुळे त्यांना धाप लागली होती. इतके गडबडीने येण्याचे कारण विचारले तर कळले की वखार भागात श्री. मेघजी भाईंचे दुकाना शेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये ते बसलेले असताना पोलिसांचा अचानक छापा पडला पण त्यातून निसटून स्वारी सहीसलामत इकडे आली आहे. मागोमाग पोलिसांचा पाठलाग होण्याचा संभव आहे. ताबड-

तोब कुठेतरी दुसऱ्या सुरक्षीत स्थळी त्यांची व्यवस्था करणे प्राप्त आहे.

आमच्या दुकाना शेजारीच कै. गणपतराव कदमांचा सोने-चांदी गाळण्याचा कारखाना होता. त्याठिकाणी. त्यांचा मारुती नावाचा तरुण मुलगा होता. खरोखर नावासारखाच. मारुतीला जे काम सांगावे ते त्याने त्वरीत पार पाडावे. त्यास बोलावून घेतले व ही असामी त्याचे स्वाधीन केली. प्रथम त्याने त्यांना आपल्या दुकानी नेले तेथून आपल्या घरी त्यांची राहाण्याची सोय केली. परंतु पुढे काही दिवसांनी तो सांगत आला की पाहुणे अचानक गायब झाले कुठे गेले त्याचा पत्ता नाही. ● ● ●

---


यंदाची महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिके मिळवणारी

आमची दोन विशेष प्रकाशने

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किमत : दहा रुपये

अनिल अवचट

**पूर्णिया**

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

# तापलेल्या मुंबईतली विधान सभा

**डॉ. अनिल अवचट**

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन तीस जुलैला सुरू होणार होते. नेहमी पहिल्या दिवशी तिथे जास्तच गडबड असते. निरनिराळे मोर्चे येतात. ते रीतसर काळ्याघोड्यापाशी अडवले जातात. गेल्यावेळेस तर अशा अडवलेल्या दोन मोर्च्यांमध्ये – सरकारऐवजी एकमेकातच मारामारी झाली होती. दुसरे असे की, सभागृहातसुद्धा अविश्वासाचा ठराव वगैरे येतो. मग विरोधी तोफा वगैरे गरजू लागतात. त्यात सध्यातर दुष्काळ आणि महागाई गाजतेय. अशावेळी विधानसभेची सुरुवात पहावी असे ठरवले. पेपरमधल्या बातम्याही आशादायक होत्या. त्यादिवशी एक लंगोटी मोर्चा तिथे येणार होता. अविश्वासाच्या ठरावाची वार्ता मिळेना. पण आदल्या दिवशी सीमाप्रश्नाच्या ठरावाची बातमी आली. म्हैसूरला नुकताच मराठी माणसांवर जोरदार लाठीहल्ला होऊन आमदार वगैरे जखमी झाले होते. त्याला अनुसरून विरोधक आणि कॉंग्रेसपक्षाच्या पाठिंब्याने स्वत: मुख्यमंत्रीच निषेध ठराव मांडणार होते. त्यामुळे पहिल्या दिवशी तो ठराव होऊन लगेच विधानसभा संपणारही होती.

हे सगळं घेऊन मुंबईला आलो. पण घडले वेगळेच. त्या पहिल्या सकाळपासूनच वातावरण इतकं अस्थिर बनले की नंतरचे तीन दिवस तिथे कोणाला कळत नव्हतं, की काय चालले आहे आणि कुठे जाणार आहे हे सगळं. तिथला एक वार्ताहर मित्र मला म्हणाला, तुझा पायगुणच असा. नाहीतर असे कधी घडत नाही. ☐

फोर्टमधील गजबजलेले वातावरण. फूटपाथवरचे इंपोर्टेड वस्तूंचे संमेलन. त्यावर अजस्त्र प्राण्यांसारख्या प्रचंड दगडी इमारती. त्या प्राण्यांच्या पायामधून वाहणारी रंगीबेरंगी गर्दी.

एक फडफडणारा झेंडा दिसला. तो हळू हळू मोठा होत गेला. त्याच्या

खालची दगडी जुनी इमारतही दिसू लागली. त्यावर नाव होतं ' विधानसभा भवन. '

कंपाऊंडशी निळ्या पोलिसांची आणि खाकी इन्स्पेक्टरांची गर्दी होती. एरवीचा फुटपाथ ट्रॅफिक थांबवून आत जाणाऱ्या गाडीला वाट करून देणे आणि जाताजाता आतल्या माणसाला सलाम करणे हे त्यांचे काम. सकाळचे अकरा वाजलेले. मंत्रीमंडळी वर लाल-दिवा लावलेल्या गाड्यांमधून येऊन थडकत होती: सलाम झडत होते. गाडी-तल्या फायली उचलल्या जात होत्या. मंत्री गाडीतून उतरल्यापासून पायऱ्या-चढून त्यांच्या ऑफिसात अदृश्य होई-पर्यंत टी. व्ही. कॅमेरा एखाद्या भुंग्या-प्रमाणे त्यांच्या चेहेऱ्याजवळ भुणभुण करीत होता.

पलिकडल्या विरोधी पक्ष दालनात गेलो. एक छोटे ऑफिस आणि पुढे मोठी खोली. मध्ये मोठे टेबल आणि भोवताली बरेचसे सोफे.

विरोधी आमदारांची साडेअकराला मिटींग होती. बहुतेकजण तिथे जमलेले होते. शे. का. पक्षाचे डी. बी. पाटील, एन्. डी. पाटील होते. भगवी हिंदू महासभा टाईप उंच टोपी घातलेले, आता जनसंघात असलेले वि. घ. देशपांडे होते. सिंहाप्रमाणे सतत झडप घालायच्या पोजमध्ये बसलेले रामभाऊ म्हाळगी होते. पांढरे केस, उंच कपा-ळाचे, समाजवादी पक्षाचे नाना पुरोहित होते. किडकिडीत, चष्मा लावलेले जोधपूरी कोटातले, बंडखोर काँग्रेसचे ए. टी. पाटील होते. शिवसेनेचे मिशा-वाले नवलकर आणि मनोहर जोशी होते.

याशिवाय कोपऱ्यात हाताला प्लॅस्टर केलेले अर्धवट उघडे गृहस्थ बसले होते. ते सायनाक. बेळगावचे, परवा मारहाण झालेले आमदार.

तेवढ्यात समाजवादीपक्षाचे ग. प्र. प्रधान हातात एक कागद फडफडवत आले. बरोबर मृणाल गोरे होत्या. प्रधान भलतेच अस्वस्थ. तोंडाने ' शॉकिंग न्यूज, शॉकिंग न्यूज ' असे म्हणत होते. आम्हा इतरांकडे पाहून ते म्हणाले, ' आऊट सायडर्स, प्लीज गो अवे ' आम्ही पलिकडे गेलो. दार लावण्यात आले. पण विरोधी आम-दारांची आवाजाची धाटणीच अशी की त्यांचे गुप्त खलबतही पलीकडल्या मंडळींना खडान्खडा ऐकू येत होते.

भानगड अशी होती की काल वसंतराव नाईकांनी जो ठराव मांडायचे कबूल केले होते त्यात ' खेडे हा घटक धरावा ' असा उल्लेख करायचे राहून गेले. तेव्हा नाईकांनी सांगितले की आम्हाला दिल्लीहून फोन आलाय की असला ठराव तुम्ही करू नका. तेव्हा मी काही हा ठराव मांडणार नाही.

त्यावर विरोधीपक्षाचे खलबत चालू झाले. दिलेला शब्द मोडला, यावर बरेच जण संतप्त होते. त्यांच्यापरीने त्यांनी हलक्या आवाजात असे ठरवले ( जे बाहेर कँटिनच्या गोंगाटातही ऐकू आले ) की एवीतेवी आपणच ठराव मांडायचाय तर मग ' कडक '

करून मांडू या. काल सी. एम्. साठी आपण ठराव 'पातळ' केला होता. त्याची आता जरूरी नाही. आणि ठराव मांडून झाला की सी. एम्. ना सभागृहातच, न जमल्यास सभागृहाबाहेर घेराव करायचा.

दार उघडले. सगळे बाहेर आले. एका आमदारांना बाजूला घेऊन विचारले, की नाईकांनी काल खरोखरीच शब्द दिला होता, का विचार करू वगैरे म्हणाले होते ? त्यावर ते म्हणाले, अहो आम्ही त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा असला संयुक्त ठराव करायचे आमच्या मनातही नव्हते. त्यांनी होऊनच हे म्हटले. मग ड्राफ्ट तयार करा म्हणाले. शे. का. वाल्यांनी एक ड्राफ्ट केला, तो त्यांना कडक वाटला. मग प्रधानांचा सौम्य ड्राफ्ट त्यांना पसंत पडला. नीट ड्राफ्टिंगसाठी त्यांनी मधुकरराव चौधरींना प्रधानांना मदत करायला सांगितले. ड्राफ्ट तयार झाल्यावर ठराव दिल्लीला पाठवायला लागेल, म्हणून झकेरियांचे इंग्रजी चांगले म्हणून त्यांना इंग्रजी भाषांतर करायला सांगितले. बाहेर प्रेसवाले आतल्या बातमीसाठी फारच उत्सुक होते. त्यांना नाईक म्हणाले, ही लोकशाही प्रक्रिया आहे, यात निर्णयाला वेळ लागतोच. जरा थांबा म्हणजे मसाला मिळेल. शेवटी साडेतीन तासांनी प्रेसला ठराव आणि बातमी दिली. एवढे झाल्यावर आता एका रात्रीत शब्द फिरवतात याला काय म्हणायचे. आजच्या पेपरला बातमी छापूनही आली. आता आम्ही सोडत नाही.

तेवढ्यात एक सतत वाजणारी बेल वाजू लागली. कँटिनमधले आमदार हातातला पदार्थ घाईघाईने संपवू लागले. सभागृहाच्या दिशेने जाऊ लागले. ◻

गोल आकाराचे सभागृह. सगळीकडे लाकडी, पॉलिश केलेले फर्निचर. समोर उंच पाठीचा देव्हारा. त्यात सभापतींचे आसन. समोर गोलाकार-कोच आणि पुढे डेस्क. त्यावर माईक. अनुकूल अशी पाटी, तिथे काँग्रेसवाल्यांनी बसायचे. प्रतिकूल पाटीशी विरोधकांनी बसायचे.

सभागृह तसे रिकामेच होते. लोक येत होते. अशावेळी काँग्रेसमधल्या आठदहा स्त्री सदस्या मात्र आधी येऊन एकदोन बाकांवरच गर्दी करून दाटीने बसल्या होत्या. (इथेही शाळा-कॉलेजासारखेच.) वर गोलाकार गॅलरी होती. तिथे प्रेसवाली मंडळी. त्यामागे प्रेक्षक गॅलरी.

बेल वाजायची थांबली. देव्हाऱ्यामागचे दार उघडले. लाल वेशातला एक मावळा हातात चांदीचा दंड घेऊन बाहेर आला. त्याने सभापतींच्या टेबलावर तो आडवा ठेवला, मागून सभापती शेषराव वानखेडे आले. निळा ग्रे सूट, वरच्या खिशात लाल रुमालाचे डोकावणारे टोक. सर्वजण उभे राहिले. सभापती बसल्यावर सर्व बसले.

एव्हाना सर्व मंत्रीही पुढच्या रांगामध्ये दिसू लागले होते. पुढच्या कोपऱ्यात वसंतराव नाईक. शेजारी

वसंतरावदादा, नंतर मधुकरराव चौधरी, इत्यादी.

सभापतींनी कामकाज सुरू केले.

म्हाळगींनी सध्याची परिस्थिती पाहता प्रश्नोत्तराचा तास रद्द करण्याबाबतचा ठराव दिला होता. तो मंजूर झाला. त्यानंतर मृणाल गोरे यांनी ठराव दिला होता. तो त्यांना मांडायला सांगितला. मृणाल गोरे यांनी उठून मी जरी ठराव देणार होते, तरी विरोधी पक्षाचे नेते श्री. डी. बी. पाटील हे दुसरा एक ठराव मांडणार आहेत. त्यासाठी मी माझा ठराव मागे घेते.

– सभापती डी. बी. पाटलांकडे वळून म्हणाले, आपला ठराव माझ्याकडे आलेला नाही. तो इकडे द्या. मी पाहून मांडायला परवानगी देईन.

दि. बा. पाटील उठून म्हणाले, मी ठराव वाचून दाखवतो. कारण या विषयात मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षांचा वचनभंग केलेला आहे.

काँग्रेस पक्षीय मंडळींकडून, यावर आरडाओरड झाली. पण डी. बी. पाटील तसेच बोलत राहिले. शेवटी सभापतींनी पाटलांना ठराव वाचून दाखवायची परवानगी दिली. पाटलांनी ठराव वाचून दाखवला. सीमा प्रश्नाबाबत महाराष्ट्र सरकारने अक्षम्य दिरंगाई केली म्हणून त्यांनी राजीनामा द्यावा, म्हैसूर सरकारने दांडगाई करून निर्घृण लाठी हल्ला केला त्याचा निषेध, नाईकांनी वचनभंग केला त्याबद्दल त्यांचाही निषेध; असे बरेचसे काही त्यांनी वाचले.

सभापतींनी सांगितले, म्हैसूर राज्यात काय घडले, याचा या सभागृहाशी संबंध पोहोचत नाही. आहे असा ठराव कसा घेता येईल ?


त्यावर केशवराव धोंगडे उठून काही बोलू लागले. रामभाऊ म्हाळगी आणखी तीन-चारजणही उठले.कोणाचे कोणाला कळेना.

सभापतींनी एकेकाला बोलायला सांगितले. प्रत्येकाची स्टाईल वेगळी असली तरी भाषणे जवळजवळ सारखीच होती. 'वरून फोन आल्याची' सगळ्यांनीच रेवडी उडवली. 'साडेतीन तास' चर्चाही प्रत्येकजण भाषणात काढीत होताच. म्हाळगी म्हणाले, दिल्लीच्या हुकूमशाहीचा आदेश मानता ? त्यावर दोनचार काँग्रेस आमदार उठून बोलू लागले. दिल्लीला हुकूमशाही म्हणता ? तिथे घटनात्मक रीतीचे राज्य आहे.

सभापतींनी यावर सीएमना निवेदन करायला सांगितले. सीएम उठले. म्हणाले, काल प्रधान आणि काही विरोधी आमदार माझ्याकडे आले असता या प्रश्नाची तीव्रता लक्षात घेऊन आपण संयुक्तपणे ठराव मांडू असे मी मान्य केले होते पण मध्यंतरी आम्हाला असा सल्ला मिळाला की असा ठराव तुम्ही केलात तर या प्रश्नामध्ये अधिक अडचणीच निर्माण होतील. म्हणून आम्ही ठराव मांडू शकत नाही असे सकाळी विरोधी आमदारांना सांगितले.

पृष्ठ ४९ वर





बाबासाहेब पुरंदरे

जंजिऱ्याचे सिद्दी म्हणजे शिवाजी महाराजांना एक कायमचे दुखणेच झाले होते. ॲबिसिनियातून आलेली ही जमात अतिशय कडवी होती. रंग काळा. ओठ जाड. केस कुरळे. शरीर धिप्पाड. बुद्धिमत्ता किंचित किंचित, पण स्वाभिमान आणि धर्मनिष्ठा अगदी तिखट ! जलाल !—त्यांच्या अंतःकरणाचा, शरिराचा आणि तलवारीचा धर्म एकच होता. इस्लाम ! बस्स् ! तेथे तडजोड नव्हती. जंजिऱ्याच्या पाणकिल्ल्यात सिद्दी कासम, खैरियत आणि संबूल हे तिघे एकदिलाने राज्य करीत होते.

महाराज शिवाजीराजे सोळा वर्षे प्रयत्न करीत होते, जंजिरा जिंकण्यासाठी. रघुनाथ बल्लाळ अत्रे, व्यंकाजी दत्तो प्रभुणीकर, मोरोपंत पिंगळे, दर्यासारंग, दौलतखान वगैरे अनेक

समशेर बहाद्दरांनी जंजिरा किल्ला जिंकून स्वराज्यात सामील करण्यासाठी जंग जंग पछाडले. पण व्यर्थ ! जंजिऱ्या-समोरचा दंडाचा किल्ला मात्र मराठ्यांनी जिंकला होता. जंजिऱ्यासाठी महाराज पुन्हा एकदा प्रयत्न करणार होते. दंडाच्या किल्ल्यांत तळ. ठेऊन जंजिऱ्यावर मोहीम करावी हा डाव मनी धरून आणि जरूर तीती या मोहिमेसाठी तयारी करून महाराज जंजिऱ्याकडे निघाले. ते रायगडावरून उतरले व जंजिऱ्याच्या रोखाने तीन कोसावर येऊन त्यांनी मुक्काम केला. त्यांच्या ध्यानी मनी स्वप्नी केवळ जंजिरा घोळत होता. रात्र झाली. रात्रीची सदर संपली. महाराजांनी चिटणिसांना निरोप दिला. महाराज अंथरूणावर पहुडले, सागराच्या लाटा त्यांच्या नजरेपुढे नाचत होत्या. होळीचे दिवस असल्यामुळे, महाराजांच्या तळा-वरचे सैनिक कुठे एका बाजूस डफ, ढोलकी, झांजा, तुणतुणी, हलग्या वाज-वीत गात होते. कोकणी सैनिक तर पायात घुंगरं बांधून नाचत होते. आभाळातून चंद्र चांदणे शिंपीत होता. दुरून कानी पडणारे ते ताल आणि सूर ऐकता ऐकताच महाराजांना अलगद झोप लागली.

अन याचवेळी, महाराजांच्या छावणी-पासून वीस कोसावर असलेल्या दंडा—राजपुरीच्या किल्ल्यातही मराठी जवान होळीचा सण साजरा करीत होते. दंड्याचा कोट समुद्रकिनाऱ्याला लागून होता. या कोटाच्या पश्चिमेला सागर-लाटा तटावर आदळत होत्या. कोटाच्या उत्तर, पूर्व व दक्षिण बाजूस जमीन होती. पूर्वेच्या बाजूस किल्ल्याचा भक्कर दरवाजा होता. हा किल्ला ऐन किना-ऱ्यावर असल्याने याच्या पश्चिम तटावर सागरलाटा आपटायच्या, या किल्ल्याच्या बरोबर पश्चिमेला अवघ्या अर्ध्या कोसावर दर्यांत सिद्दीचा जंजिरा होता. अगदी तोंडावरच शत्रूचा जंजिरा अस-ल्यामुळे दंडा किल्ल्यातले मराठे सैनिक अत्यंत सावध असत. जंजिऱ्यातील सिद्दी कासम, सिद्दी खैरियत आणि सिद्दी संबूळ या तिघा कर्दनकाळ हबशी वैऱ्यांना आपल्या ऐन नाकासमोर शिवाजीराजाचे ठाणे वसलेले सहन होत नव्हते. पूर्वी हा दंडा किल्ला सिद्दींचाच होता. पण महाराजांच्या सैन्याने तो जिंकून घेतला होता. दंडा किल्ला परत घेण्यासाठी सिद्द्यांनी अनेकदा अपार धडपडी केल्या. एकदा तर त्यांनी दंडा किल्ल्याजवळच्या मोठमोठ्या झाडांवर तोफा चढवल्या आणि झाडावरून तोफांचा मारा दंडा किल्ल्यावर केला ! पण व्यर्थ ! किल्ल्यावरचा भगवा झेंडा अढळच राहिला.

होळी पौर्णिमेच्या आधी जंजिऱ्यात सिद्दींनी अगदी गुप्त खलबत केलं. दंडा किल्ला घेण्याचा त्यांनी बेत केला. डाव बिनतोड होता. डाव असा होता. सिद्दी खैरियतने पाचशे हबशी जवान घेऊन आधीच दूर अलिबागच्या दिशेने गल-बतातून जायचे. रात्र पडताच किनाऱ्या-वरील एखाद्या लहानशा गावाला गल-बत लावायचं. पाचशे जवानानिशी तिथं

उतरायचं अन रातोरात दबत दबत किनाऱ्या किनाऱ्याने मुरूडपाशी झाडीत यायचं. मध्यरात्रीच्या सुमारास सिद्दी कासमने असेच गुपचूप हजार हबशी हशम घेऊन निघायचं. हे हजार जवान छोट्या छोट्या होडग्यातून न्यायचे. आणि दंडा किल्ल्याच्या सागरी तटाशी नेऊन भिडवायचे. अन्–ठरलं! यासाठी दिवसही त्यांनी निवडला तो होळीच्या सणाचा! दंडा किल्ला सण साजरा करण्यात नक्कीच गुंतलेला असणार! बस्स् ठरलं!

पौर्णिमेच्या सकाळीच पाचशे हशम घेऊन खैरियत सागरावर अलिबागेच्या रोखाने गेला. सबंध दिवस त्याने दर्यावर रेंगाळत काढला. अंधार पडताच त्याने एका खाडीत गलबत घातलं! सारी कोकणी खेडीपाडी बहिरीच्या नाही तर काळकाईच्या देवळापुढं होळीचा सण गात नाचत गाजवीत होती. सिद्दीचे पाचशे जवान झाडाझुडपातून मुरूड–दंडा-राजपुरीकडे चालू लागले.

मध्यरात्रीचा अमल झाला. दंडा किल्ला जागा होता. किल्ल्यात मारुतीच्या देवळापुढं होळी धगधगत होती. हलग्या, ढोलगी, झांजा, झेंगट, तुणतुणी झणाणत होती. पायात घुंगरं बांधलेले कोकणी जवान नाचत होते. त्यांच्या हातातले कापडाचे फलकावे ते रुमालासारखे उडवीत होते. शिळा फुंकारल्या जात होत्या. ताल चढत होता. गती वाढत होती. तोंडाला पिवडी फासून अन् साडी चोळी नेसून एक जरा कोवळा गडी घुंगरं बांधून अन साडीच्या पदराचं टोक उंच धरून रिंगणात नाचत होता. ही तर कोकणची लाडकी गोमू! होळीच्या जाळाचा पिवळट प्रकाश मधून ठिणग्या उधळीत नाचत होता. नाच बघण्यात सारे सैनिक दंग झाले होते. तटावरून गस्त घालीत फिरणारे मराठेही या नाचगाण्याची मौज दुरुन बघत होते. गोमू नाचत होती. गोमू लाजत होती. गोमू मुरकत होती. वाद्यांची झिणझीण अंगावर शिरशिरी उठवीत होती. मधूनच अस्सल फाल्गुनी उखाणा खणखणीत आवाजात उठत होता अन् गोमूसकट तमाम मंडळी ठणाणाणा बोंबलत होती. लगेच वाद्ये झणाणत होती. गोमू पदराचा फलकावा नाचवीत थयथयत होती. वाघाचा मुखवटा घालून अंगावर वाघाचं कातडं पांघरलेला एक 'वाघ' आपलं लोळणारं शेपूट स्वतःच डाव्या हाताने उंच धरीत अन् डरकाळ्या फोडीत गोमूच्या भवती नाचत होता. फड रंगला होता.

याचवेळी किल्ल्याच्या दरवाजासमोर पूर्वेच्या झाडीत खैरियत पाचशे हबशांनिशी दबा धरून बसला होता.

याच वेळेला किल्ल्याच्या पश्चिमेला समुद्रात सुमारे चाळीस छोट्या छोट्या होडग्या सुसरीसारख्या किल्ल्याकडे सरकत होत्या. या होडग्यात काही शिड्या होत्या. दोडखंड होते. स्वतः सिद्दी कासम एका होडग्यात बसला होता. कोणाच्याही तोंडून चकार शब्दही उमटत नव्हता. सारी होडगी किल्ल्याच्या तटालगत गेली. कासमने लगेच एका चपळ हबशाला खैरियतला इशारा करण्या-

साठी सोडले. तो हबशी किनाऱ्यावर दबत दबत, रांगतरांगत, झाडाझुडपातून गेला.

खैरियत किल्ल्याच्या पूर्वेकडील, म्हणजेच दरवाजासमोरील झाडीत कासमच्या निरोपाची आतूरतेने वाट बघत होता. कासम आपल्या जवानांनिशी समुद्रातून किल्ल्यापाशी पोहोचल्याशिवाय खैरियतला पुढचा डाव करता येत नव्हता. एवढ्यात खैरियतला झाडीतून दबत येणारा माणूस अंधूकसा दिसला. खैरियतने तलवार अलगद उपसली. पण येणारा माणूस आपलाच आहे हे लक्षात येताच खैरियतला आनंद झाला. आलेल्या हबशाने खैरियतला खटकन् झुकून कुर्निसात केला आणि त्याने कासमचा निरोप खैरियतला सांगितला की, 'आम्ही तटाखाली होडग्यातून पोहोचलो आहोत. तटाला शिड्या लावल्या आहेत. तुम्ही किल्ल्याच्या दरवाजावर हल्ला चढवा. म्हणजे आम्ही शिड्यांनी तटावर चढतो व किल्ल्यात उतरतो!'

खैरियत खूश झाला होता. त्याने आपल्या जवानांना इशारा केला. बंदुकवाले हशम भराभरा पुढे सरसावले.

तटाला शिड्या लावून कासम कान टवकारून उभा होता, खैरियतच्या बंदुकांच्या गोळ्या ऐकण्यासाठी. गोळ्यांचा आवाज उठला की, भराभरा तटावर शिड्यांनी चढायचं. वरून अनेक दोर सोडायचे. म्हणजे हबशांना वर झपाट्याने पोहोचता येईल. खैरियतने समोरून दरवाजावर हल्ला चढवला की, स्वाभाविकच किल्ल्यातील मराठ्यांचे मुख्यतः लक्ष त्याच हल्ल्याकडे जाईल. अन् आपण मागच्या, पश्चिम तटावरून भराभरा किल्ल्यात उतरून हल्ला चढवू. मराठे खैरियतला प्रतिकार करीत बसतील! आपल्याकडे दुर्लक्ष होईल! त्याचा फायदा असा उठवायचा! एकूण असा हा सिद्दीचा डाव होता.

किल्ल्यात गोमू रंगात आली होती. अवघे मराठे भान विसरले होते.

एवढ्यात एकदम थाड् थाड् थाड् थाड् थाड् थाड् बंदुकींचे आवाज कडाडू लागले. त्याचे प्रतिध्वनी उठू लागले. प्रचंड आरोळ्या उठल्या.

इकडे कासमने बंदुकांचा आवाज ऐकताच शिडीत पाय घातला. तो पुटपुटला,

'याह अली! खुदा मदद!'

कासम झपाट्याने शिडी चढू लागला. त्याच्या मागोमाग व इतर शिड्यांवरूनही त्याचे जवान भराभरा पण गुपचूप वर चढू लागले. त्यापैकी काहींच्या जवळ दोर होते.

बंदुकींच्या गोळ्या सुटतच होत्या. पाचशे हबशांचा कल्लोळ उठतच होता. गोमूचा नाच एकदम थांबला. सारे मराठे एकदम, 'हल्ला आला! हबशांचा हल्ला आला!' असे ओरडत भराभरा धावत सुटले. जो तो आपआपली हत्यारे घेण्यासाठी धाऊ लागला. किल्लेदार व सबनीस ताबडतोब दरवाजाजवळच्या बुरुजांवर धावत गेले. समोरून शत्रू सरळ सरळ दरवाजाच्या

रोखाने हल्ला करीत येत आहेत असे त्यांना दिसले. हबशांच्या फौजेत पांगून पांगून बऱ्याच मशालीही दिसत होत्या. असा आभास होत होता की, हबशांची संख्या आठदहा हजार असावी ! किल्लेदाराने भराभरा हुकूम देण्यास सुरुवात केली. मराठी गोलंदाजांनी तोफा ठासण्यास व किरण साधण्यास सुरुवात केली. बंदुकांचीही मारगिरी मराठ्यांनी सुरू केली. सारे मराठे केवळ पूर्वेकडून दरवाजावर येणाऱ्या हल्ल्याला तोंड देण्यात मग्न झाले.

या वेळी कासमचे शेसव्वाशे जवान तटावर दाखल झाले होते. अनेक दोर व अनेक शिडया आता मदतीला असल्यामुळे हबशी फार झपाट्याने किल्ल्यावर चढत होते. साऱ्या मराठ्यांची धावाधाव व शक्ती केवळ खैरियतच्या हल्ल्यावर केंद्रित झाल्यामुळे त्यांना, पाठीमागच्या बाजूने कासम ससैन्य किल्ल्यात उतरतोय याचा पत्ताच लागला नाही ! कासमच्या तडाख्यात तुरळक कुणी मराठे लागले. पण त्यांची मुंडकी उडाली.

खैरियत आपल्या लोकांनिशी अगदी राक्षसी आव आणून हल्ला करीत होता. पण त्या हल्ल्यात त्याचा आरडाओरडाच जास्त होता. किल्ल्यात दारूगोळ्याचे एक कोठार होते, तोफा बंदुकांसाठी लागणारी ही दारू व गोळे मराठी सैनिक भराभरा या कोठारातून नेत होते. पूर्वेकडे तोफाबंदुकांचा अक्षरशः तडाका चालू होता.

सिद्दी कासम अगदी पुढे अन् मागोमाग त्याच्या सैन्याच्या टोळ्या आता किल्ल्यातील या दारूगोळ्याच्या कोठाराकडे धावत होत्या. आता मात्र मराठ्यांना पत्ता लागला की, शत्रू मागच्या बाजूने आपल्या घरात घुसला! किल्लेदाराचे काळीजच फाटले. कासमच्या फौजेवरही हल्ला करण्यासाठी आपल्या लोकांना तो हुकूम देऊ लागला. तो स्वतःही बुरुजाच्या पन्नाससाठ पायऱ्या धावत धावत उतरत कासमच्या रोखाने निघाला.

दारूगोळ्याच्या कोठारापाशी पंधरा सोळा मराठे दारू बाहेर काढण्यात गुंतले होते. एवढ्यात कासम आला. त्याच्या मागोमाग खूप हबशी टोळ्या येतच होत्या. एवढ्यात कासमच्या बरोबरचे दहाबारा हबशी दारूकोठाराजवळील मराठ्यांवर हल्ला करण्यासाठी धावले. एवढ्यात एकदम किंकाळी फुटली अन् ते दारूचे कोठार एकदम भडकले ! धडाड् धड् धाड् धाड् धाड् धडाडाडाडाडा ! त्या पंधरा सोळा मराठ्यांच्या आणि दहाबारा हबशांच्या चिंधड्या उडाल्या ! आवाज तर एवढा प्रचंड झाला की दाही दिशा फाटाव्यात ! प्रचंड धूर उसळला. कोणालाच काही दिसेना समजेना.

–आणि येथून वीस कोसावर छावणीत झोपलेले शिवाजीमहाराज एकदम दचकून जागे झाले. ते बिछान्यावरून एकदम उठले अन् ओरडले,

'दगा झाला ! हमखास दगा झाला !'

पलंगपहाऱ्यावरचा हुजऱ्या आणि

तंबूच्या भवती असलेले पहारेकरी मावळे तर जागेच होते. एकदम महाराज का उठले अन् ओरडले हे कोणास कळेना. सारे भराभरा महाराजांभोवती गोळा झाले. त्यांनी घाबऱ्या घाबऱ्या विचारलं,

'महाराज काय झालं? कसला दगा?'

महाराज अतिशय अस्वस्थ होते. ते म्हणाले,

'नक्की नक्की दंडा राजपुरीच्या किल्ल्यांत काही तरी दगा फटका झाला आहे!'

सारेजण एकमेकांकडे बघत राहिले. कारण मध्यरात्र टळून गेली होती. सर्वत्र इतकी शांतता होती की, पाल चुकचुकली तरीही प्रतिध्वनी यावा. किंचितसाही कुठं आवाज उठला नाही. मग महाराजांना वीस कोसावरच्या दंडाराजपुरीच्या किल्ल्यातला दगाफटका कसा समजला? निश्चित हे स्वप्नच! हा भासच! पण कुणी काही बोललं नाही. कुणी बोलायच्या आतच महाराज म्हणाले,

"हा भास नव्हे! हे स्वप्नही नव्हे! हे सत्य असले पाहिजे!"

समोर बाळाजी आवजी चिटणीस हजर झाले होते. महाराज म्हणाले,

"चिटणीस, ताबडतोब दंडाराजपुरीला हरकारे स्वार पाठवा. किल्ल्याची खबर मागवा."

चार मराठी हरकारे स्वार रातोरात दंडाराजपुरीकडे दौडत निघाले.

—दारूच्या प्रचंड स्फोटाने भयानक कल्लोळ उडाला. किंकाळ्या, आरोळ्या आणि जखमी लोकांचे भयंकर विव्हळणे उठत होते. त्या प्रचंड धुरातून माणसे आडवीतिडवी पळत होती. कासमच्या मागोमाग येणाऱ्या सैन्याचा तर गोंधळ उडाला. या भयंकर स्फोटात आपला नेता कासम मेला. चिंधड्या चिंधड्या होऊन मेला या भयंकर कल्पनेने ते सैनिक एकदम खिन्नावले अन दुःखाने ओरडू लागले.

सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. हीरक महोत्सवानिमित्त
विविध सुखसोयी—अद्यावत पद्धतीचे भोजनगृह

सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड
क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई २

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था

"हुजूऽऽर! अय् खुदाऽहमारे मालीक कहाँ है! हुजूऽऽर!"

ते हबशी जवान सैरावैरा धावू लागले. एवढयात जमिनीवर पडलेला एक जवान उठला. उठत उठत तो ओरडू लागला,

"मैं कासम हूं! मैं जिंदा हूं!"

कासम जिवंत होता! सहीसलामत! तो आपल्या जवानांना मोठ मोठ्याने ओरडून सांगत होता,

"मै कासम हूं! मै जिंदा हूं! मेरे बहादूर सिपाहियो! मत बिखरो, मत बिखरो! मुझे कोई धोका नही! अल्ला हु अकबर!"

कासमच्या या गर्जनेने सर्वांना आवेश चढला. दारूगोळ्याच्या स्फोटाहूनही हा आनंदाचा स्फोट भयंकर होता. हजारपट बळाने ते सारे हबशी मराठ्यांवर तुटून पडले. अगदी आघाडीला होता तलवार अस्मानात नाचवीत धावणारा सिद्दी कासम. तो मोठमोठ्याने खास हबशांची युद्ध घोषणा देत होता,

"खस्सू! खस्सू! खस्सू! खस्सू!"

अवघे हबशी जवान ओरडत होते,

"खस्सू! खस्सू! खस्सू! खस्सू!"

किल्ल्यात भयंकर रणकंदन सुरू झाले. दरवाजा उघडला गेला. खैरियतचे जवान आणि खैरियत किल्ल्यात गर्जत गर्जत घुसले. रक्तात किल्ला भिजून गेला. मराठ्यांच्या प्रेतांनी भुई झाकून गेली. भगवा झेंडा उडाला. दंडापुरीचा किल्ला जंजिऱ्याच्या सिद्दींनी घेतला. दिनांक १० फेब्रुवारी १६७१.

पहाटेच्या सुमारास महाराजांचे हरकारे घोडेस्वार दंडापुरीपासून एका मजलेवर येऊन पोहोचले. झाडाझुडपांच्या गर्दीतून दंडा किल्ला दिसत होता. त्याच्यावरचा भगवा झेंडा नाहीसा झाला होता. तेथे सिद्दीचा झेंडा फडकत होता. जंजिऱ्याच्या किल्ल्यात नौबत दणाणत होती. ● ● ●

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

रवीन्द्र पिंगे

शतपावली

# लेखणीबहाद्दर

आपली कुंडली त्याने नीट वाचलेली होती. होरे वर्तवले होते. कोण होता तो ? कुठून निघालेला ? कुठला टप्पा त्याला गाठायचा होता ? फळचा-वर सर्व गणित सोडविलेलं असावं तसं त्याच्या जिंदगीचं गणित त्याच्या मनः-पटलावर व्यवस्थित सोडविलेलं होतं. त्याची जन्मदात्री आई एक फालतू नटी होती. जन्मजात कंगाल. तिने कुठल्या तरी फिरत्या नटाशी केलेल्या क्षणिक दोस्तीतून त्याचा जन्म झाला होता. आपला जन्म झाला इतकंच त्याला कळलं. बाप कोण ? ते सर्वांनीच गुलदस्तात ठेवलं. का ? त्याला धड कारण कळलंच नाही. त्याच्या कानावर फक्त इतकंच आलं की त्याची आई अविवाहीत होती. ती फिरत्या नाटक कंपनीबरोबर गावोगाव हिंडायची. ह्याला पोटात घेऊन नऊ महिने हिंडलीही. पण पुढे ह्या गोळ्याला थंडी-वाऱ्यातून फिरवायचं तरी कुठे कुठे ? तशात तिचं हातावर पोट. रात्री तोंड रंगवेल तेव्हा कुठे दुपारचं अन्न भेटणार. अशी परवड होती. तिने सरळ ह्याला एका ओळखीच्या कुटुंबात ठेवला. चक्क ओटीत घातला. म्हणाली, ‘तुमच्या घरचे चार, त्यात माझा हा एक तुमचाच पाचवा समजा. प्रेमाने वाढवा, लहानाचा मोठा करा.’

त्याच्या मते त्याच्या ह्या जन्म-कहाणीतच त्याची कुंडली स्पष्ट झालेली होती. त्याला घराण्याचा म्हणून लखलखीत असतो तसा पूर्वेतिहास नव्हता. त्याला बाप होता. कुठे तरी तोंडाला रंग लावून भटकत होता. मात्र आपला बाप नेमका कोणता ते तो सवंगड्यांना सांगू शकत नव्हता. जिथे खुद्द बापाचाच पत्ता नाही, तिथे बापजाद्यांच्या नावाने फुली मारलेली असणार हे उघडच होतं. म्हणजे घरंदाज परंपरेच्या पुंजीच्या नावाने भल मोठं पूज्यच होतं. बाप-कमाईचे हे असे बारा वाजलेले ! आई

भटक्या नाटक कंपनीत नटी म्हणून दाखल झालेली गरजवंत. म्हणजे घसघशीत भाग्याला तिकडूनही टाळं लागलेलं. ज्या मैत्रिणीच्या ओटीत ह्याला घातला ते घर होतं एका गावठी गवळयाचं. घरप्रमुख सांजसकाळ आळीत दुधाचा रतीब घालायचा. हा छोटू त्याला मदत करायचा. दुधाची गाडी लकटायचा, माडीवरल्या गिऱ्हाईकांना दूध पोहोचतं करायचा. रतीबाची फेरी पुरी केली की दुधाचे हंडे चकचकीत घासायचा. असं हे काम वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस यंत्रासारखं चालायचं. हा सारा खटाटोप कशासाठी? दोन वेळा जेवण्यासाठी. नास्त्यासाठी.

ही आगतिक वस्तुस्थिती तळहातावर ठेवून त्याने आपली कुंडली चोख वाचली. निष्कर्ष फक्त एकच काढला: स्वत: मेल्याशिवाय आपल्याला स्वर्ग दिसणार नाही; दुसरा कुणी स्वयंप्रेरणेने आपल्या मदतीला धावून येईल हे संभवत नाही; इथपासून पुढे फक्त आपला हात जगन्नाथ!

हो; खरं आहे. आपला हात जगन्नाथच असतो. वादच नाही. पण ह्या हातांनी काय घडवायचं? आपलं भाग्य आपण आपल्या मनगटातल्या पाण्यानेच घडवायचं हे खरं; पण अखेर साध्य काय करायचं? आपल्या आयुष्याला कसला घाट द्यायचा? त्याने रात्रंदिवस विचार केला. दूधाचा रतीब घालताना केला. हंडे घासताना केला. आळीतल्या मुलांना खेळताना पाहून केला. विचार-विचार-विचार. आणि मग साऱ्या जीवनाचं सूत्र ठरवलं:

दारिद्र्य खणून काढायचं; आपल्या गरिबीवर सूड उगवायचा; लखपति व्हायचं. आपल्याला तर बापाचं नावच सांगता येत नाही. आपण असं अलौकिक नाव कमवायचं की जे सांगताना आपल्या मुलाबाळांना नि पुढच्या पिढयांना धन्य वाटेल!

तथास्तु!

पण इतपत निर्धार तर सर्वजण करतात. एडगर वॅलेसचं वैशिष्ठ्य असं की मनाने वरलेला हा निश्चय कृतीत उतरविता यावा म्हणून त्याने गवळयाच्या घराचा निष्कांचन अवस्थेत त्याग केला आणि ब्रिटीश फौजेत त्याने सामान्य चपराश्याची नोकरी धरली. तो फौजेतला ऑर्डर्ली, म्हणजे निरोप्या झाला. फौजी अंमलदारांच्या हाताखाली काम करू लागला. अंमलदारांच्या बुटांना पॉलीश चोपडण्यापासून बंदूकांची नळकांडी साफ करण्यापर्यंत.

हात अविरत कष्टत राहिले. ते हात की जे जगन्नाथ होते.


भाग्यचक्र फिरू लागलं.

फौजेबरोबर तो दक्षिण आफ्रिकेत बदली होऊन गेला. तिथे बोअर युद्ध सुरू होतं. खंदकात रहायचं. आला क्षण आपला मानायचा. पुढच्या क्षणाची शाश्वती नाही. चोवीस तास मरणाशी गाठ. अनुभव मात्र अजिबात नवा.

भाग्यचक्र फिरू लागलं.

तो फावल्या वेळात प्रासंगिक कविता करू लागला. वाचकांना त्या वेगळया

पृष्ठ ४३ वर



# क्रांतीवीर नानासाहेब पुरोहित

राम बिवलकर

गतवर्षी काँग्रेसच्या उमेदवार सौ. कमलाताई विचारे यांचा महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महाड-पोलादपूर मतदार संघात दणदणीत पराभव करून विधानसभेवर निवडून आलेले समाजवादी आमदार म्हणून श्री. नानासाहेब पुरोहितांचे नाव आजच्या तरुण पिढीपुढे आले. १९६२ सालापासून झालेल्या ६२, ६५, ६७ च्या तिन्ही निवडणुकात समाजवादी उमेदवाराचा काँग्रेसने पराभव केला व महाड-पोलादपूर मतदारसंघावरील आपली मांड घट्ट केली होती. या पार्श्वभूमीवर नानांचा विजय गाजला हीही गोष्ट खरी. पण ते सहजासहजी घडले नव्हते. सत्ताधारी पक्षाची पकड खिळखिळी करणे एखाद्या सामान्य मध्यमवर्गीय समाजवाद्याला जमणे आजच्या खर्चिक निवडणुकीच्या राजकारणात तरी कठीण आहे. असे असतानाही हे घडले कसे ? यामागे नानांची चाळीस-पन्नास वर्षांची तपश्चर्या उभी आहे याची जाणीव तरुणपिढीला नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात आपली

जात, गोत विसरून या माणसाने बेबंद उडी कशी घेतली होती आणि खोता-जमिनदारांचा रोष पत्करून अडाणी, दुर्बळ, वेडया गरीब शेतकऱ्यांना त्या मिरासदारीशी दोन हात करण्याकरता कसे पेटवून उठले होते हे फार थोडयांना माहित असेल.

बिरवाडीच्या एका दशग्रंथी ब्राह्मणाचा हा मुलगा. घरी संस्कार वेदशाळेचे. बडोदा सरकारचे पुरोहित म्हणून रु. ५००० चे वर्षासन घराण्यात पिढयान पिढया चालत आलेले. मुलगा शाळेतून घरी आला तर त्याने स्नान केल्याशिवाय घरात शिवायचे नाही असा कर्मठ दंडक घरात चालायचा. वडिलांच्या पिढीपर्यंत वर्षासन हजारापर्यंत आकसलेले. त्यात भाऊबंदकीच्या वाटण्या. सहा मुलगे आणि चार मुलींचा विनायकरावांचा मोठा संसार. वडील मुलगा म्हणून नानांवर कुटुंबाची खूपच भिस्त.

पण शाळेत असतानाच १९२० साली लोकमान्य गेले तेव्हा बिरवाडीत त्यांना जी श्रद्धांजली वाहिली गेली—भाषणे झाली—केसरीचा अग्रलेख सभेत वाचला गेला—त्याचा जबरदस्त परिणाम होऊन वयाच्या १३ व्या वर्षीच हा मुलगा राजकारणाकडे खेचला गेला. बिरवाडीचे शिक्षण संपल्यावर महाडच्या मिशन हायस्कूलमधील नाव काढून कै. आचार्य स. ज. भागवत व श्री. विनायकराव उपाध्ये यांनी चालू केलेल्या राष्ट्रीय शाळेत दाखल झाला. त्यामुळेच पुढे रेल्वेत नोकरी लागली तर रेल्वेमेन्स युनियनचा तो कार्यकर्ता बनला. २८ सालच्या संपात झाबवाला, रुईकर, अँन्थनी पिल्ले यांसारख्या मजूर नेत्यांच्या पावलावर पाऊल टाकून संप लढवू लागला. संप बारगळला. व्हिक्टिमायझेशन झाले तर बडतर्फ केलेल्या कामगारांना परत कामावर घ्यावे म्हणून त्याने सत्याग्रह मांडला. त्यापोटी ४ महिन्यांची सक्तमजुरी सोसली.

पण नानांना रेल्वेचे संपच खेळत बसायचे नव्हते. भारतमातेच्या बेडया तोडायच्या होत्या. त्या क्रांतिकारकमार्गांनी तुटतील अशी त्यांची धारणा बनली होती. ते तसे बोलूनही दाखवीत. त्यामुळे जबलपूरला असताना १९३० साली त्यांच्यावर एक मोठा प्रसंग गुदरला. गोऱ्या लोकांच्या लोको सुपरिंटेंडेंस क्लबमध्ये-कुणीतरी बॉम्ब ठेवलेला सापडला तशी घबराट पसरली. चौकशीची सत्रे सुरू झाली. क्लबच्या कार्यालयात नानांचा जिवश्च कंठश्च स्नेही लक्ष्मीप्रसाद पांडे हा नोकरीला होता. पोलिसांनी त्याची व नानांची दोस्ती लक्षात घेऊन—नाना रेल्वे युनियनचे सेक्रेटरी होते ही गोष्ट ध्यानी घेऊन, दोघांनाही वहिमावरून पकडले. पोलीस कोठडीत डांबले. पोलीस सबइन्स्पेक्टर पठाण यांनी, वहिमीकडून कबुली काढण्याच्या इराद्याने रात्री ९ वाजता त्यांना कस्टडीबाहेर काढले. लक्ष्मीप्रसाद गडबडून गेला. आता पोलीस आपल्याला थर्ड डिग्री ट्रिटमेंट देणार, मार-हालअपेष्टा सहन कराव्या लागणार याची दोघांनाही खात्री पडली. मार कसा

चुकवावा ? याचा विचार पक्का होताच, नानांनी लक्ष्मीप्रसादला सांगितले.

'हे बघ प्रसाद, घाबरायचे नाही. आम्ही गुन्हा केलेला नाही हे ठासून सांगायचे. दुसरे काहीही बोलायचे नाही.'

: हो.

: बाकी आणखी काय करायचे ते मी पाहतो. पठाणांपुढे चौकशी सुरू झाली. दोघांवर प्रश्नांचा भडिमार करूनही हवे ते उत्तर मिळेना. तेव्हा पठाण जमादाराला म्हणाले,

: जमादार, यांना आता तुम्ही आपल्या ताब्यात घ्या. पोलिसी इंगा दाखविल्याशिवाय ही पोरे वळणार नाहीत. जमादार पुढे सरसावला. त्याबरोबर चवताळून नाना पठाणांना म्हणाले,

: देखो, पठाण, तुम हमको मारेंगे तो याद रखना, हम तुम्हारी जान लेकेही रहेंगे.

नानांचा अवतार पाहून पठाण दचकला. त्याने जमादाराला या दोघांना परत कोठडीत टाकण्याची आज्ञा दिली.

नानांच्या आक्रमक भूमिकेचा परिणाम म्हणून दुसऱ्या दिवसापासून पठाण गोडीत बोलू लागला. काहीच हाती लागले नाही तेव्हा त्याने त्या दोघांना ५।७ दिवसांनी सोडून दिले.

या प्रसंगातून आपण काहीतरी क्रांतिकारक करावे असे नानांना वाटू लागले. रेल्वे युनियनच्या कामात रस वाटेना. मग ते रुईकरांना भेटले.

: रेल्वे युनियनचे काम मी सोडून देतोय्.

: का ?'

: मला बॉम्ब तयार करायचे शिक्षण घ्यायचे आहे.

: विचार केलास पुरा ?'

: हो. जोगेंद्र शुक्ला. चंद्रशेखर आझाद यांना भेटायची, मदत करायची इच्छा आहे.

: मग अडले कुठे ?

: पैशाकडून.

रूईकर विचारात पडले. पण थोड्याच वेळात म्हणाले.

: त्रितळचांच्या ऑल इंडिया रिपोर्टरचा फिरता प्रतिनिधी होतोस ? देशभर फिरायला मिळेल.

: केव्हा देता ती नोकरी ?

: आत्ता म्हणालास तर आत्ता लगेच.

: मी तयार आहे.

रुईकरांनी म्हटल्याप्रमाणे नानांना नोकरी दिली. त्यांचे पहिले पोस्टिंग पंजाबात लाहोरला झाले. नाना या नोकरीत साडेतीन वर्षे राहिले. १९३१ साली वडील वारल्याचे समजले तरीही घरी बिरवाडीला गेले नाहीत. अनेक क्रांतिकारकांच्या भेटी त्यांनी घेतल्या. चर्चा झाल्या. हातबॉम्ब तयार करण्याचे शिक्षणही त्यांनी घेतले. पण त्यातून निष्पन्न निघाले ते असे, की १९३६ साली नाना नागपूरला जाऊन रूईकरांना भेटले.

: या. कसा काय चाललाय जनसंपर्क ?

: उत्तम.

: परत कामगार चळवळीत येणार का ?

: नाही.

: मग ? क्रांतिकारकांच्या गटात सामील होणार का ?

: नाही

: मग काम करणार ?

: मी गावी परत जाणार आहे.

: गावी परत ?

: हो. तिथं जाऊन किसान चळवळीत पडणार.

: एकदम हा नवा पवित्रा ?

: या देशाचा किसान जागा झाल्याशिवाय, अन्यायाविरुद्ध पेटून उठल्याशिवाय स्वातंत्र्य जवळ यायचे नाही अशी माझी पक्की धारणा झाली आहे.

: तिथे तुला साथ मिळेल का ?

: पाहू या.

: जरूर परत जा. कुठल्याही क्षेत्रात पडलास तरी तू स्वस्थ बसणार नाहीस हे मला माहीत आहे.

१९३७ साली नाना अचानक बिरवाडीला परतले. वडील जाऊन ६ वर्षे झाली होती. धाकटे भाऊ खुटुरूटू काहीतरी करून पोट भरीत होते. एकदोघे शिकत होते. मोठा मुलगा घरी आला म्हणून आईला बरे वाटले. पण नानांनी घरी येताच नोकरी-बिकरी न करता किसानांना संघटित करण्याचा आपला निर्धार बोलून दाखवला.

नाना आता बिरवाडीच्या आसपासच्या गावातून फिरू लागले. स्वातंत्र्याच्या, क्रांतीच्या, उत्थानाच्या गोष्टी बोलू लागले. शेतकऱ्यांना जवळ ओढायचा प्रयत्न करू लागले. खोती-जमीनदारी नष्ट केली पाहिजे, कुणाचीही मिरासदारी चालू देता कामा नये असे गरीब शेतकऱ्यांना पढवू लागले. पण या बामणाला मिळावा तसा प्रतिसाद मिळत नव्हता. संबंधी खोत आणि जमिनदार-मंडळी मात्र त्यांचा दुस्वास करू लागली.

त्याच साली बिरवाडी भागात पडलेल्या दुष्काळाने एक सुवर्णसंधी नानांकडे चालून आली.

दुष्काळामुळे गरीब शेतकऱ्यांची अवस्था मोठी कठीण झाली होती. घरात अन्न नाही. सावकार कर्ज देत नाही. खोत पाठी लाथ घालायला निघतो. वैरणकाडीसाठी पैसा जवळ नाही. पाणीही मिळणे दुरापास्त. काम करावे काय ? या महाप्रश्नातून—बिरवाडीच्या आसपासच्या दहावीस गावच्या शेतकऱ्यांनी बिरवाडीला एक सभा घ्यायचे ठरविले. सभा जाहीर झाली. पुढारी कुणीच नव्हता. खोता-जमीनदारांविरुद्ध उभे राहायचे होते—तेव्हा तसे पुढारीपण करण्याची कुणाची छातीही नव्हती. गावात अशी कुणकुण होती, की सभेत असे ठरायचे आहे, की खोतांजवळ—सावकारांजवळ गोडीगुलाबीने धान्य मागायचे—पण ते नाहीच म्हणाले तर 'हरहर महादेव' म्हणून त्यांची कोठारे लुटायची. मग काय होईल ते होईल.

त्यामुळे सभेकडे सारेच दबकून पाहत होते. या सभेचे नेतृत्व आपण घ्यावे असे नानांना वाटत होते. पण त्यांना सभेचे निमंत्रण नव्हते. नाना अस्वस्थ होते. घराच्या पडवीत येरझारा घालीत होते. एवढ्यात गावातले दोन

शेतकरी—हरी पवार आणि तुकाराम सावंत—सभास्थानी—म्हणजे बहिरीच्या देवळाकडे जाताना नानांना दिसले. नानांनी त्यांना हटकले,

: काय हरबा, दुपारीच कुठे ?

: जरा गावकी आहे. बहिरीच्या देवळात.

: मला ठाऊक आहे. काय करायचे ठरवले आहे ?

: नाना, तुम्ही परिस्थिती बघता. दाना पिकवतो तोच शिताला महाग झालाय्—तुकाराम म्हणाला.

: होय. म्हणूनच तुमचा विचार काय आहे ?

नानांना सांगावे का न सांगावे असा विचार करीत हरी पवार म्हणाला,

: सावकाराकडे मागायचे...नाही तर...

: लुटायचे—असेच ना ?

: ना...नाय बा.

: अरे, त्याला माझा विरोध नाही. पिकविणारा उपाशी आणि खोत पान चघळीत लोडाशी, हा प्रकार संपायलाच हवा.

: पण...

: हे बघ हरबा, मला काही तुमच्या सभेचे निमंत्रण नाही. पण तुम्हाला काही मार्गदर्शन लागलेच तर मला बोलवा—मी येईन.

: नाना, तुम्ही याल ?

: जरूर येईन.

हरबा अन् तुकाराम बहिरीच्या देवळाकडे गेले. गोडीगुलाबीने खोत भात देणार नाहीत यावर सर्वांचे एक-मत पडले. पण दुसरा पर्याय कोठचा लुटायचा. त्यात पुढाकार कुणी घ्यायचा ? मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधावी याचा विचार मंडळी करीत होती ! !

मग हरबाने नानांचे नाव सुचविले. एक बामण आपले पुढारपण पत्करणार याचा साऱ्यांनाच आनंद वाटला. नानांना बोलावणे गेले. नाना सभा-स्थानी गेले. चारपाचशे शेतकरी जमले होते. नाना त्यांना म्हणाले,

: तुम्ही म्हणता, कोठारे लुटायची हा गुन्हा आहे. साहजिकच सरकार तुम्हाला पकडील. लुटलेले धान्य जप्त करील. तुम्हाला शिक्षा होईल. तुरुंगात डांबले जाईल. पण असे वाटेल ते काही झाले तरी पाऊल मागे घ्यायचे नाही असा तुमचा निर्धार आहे का? तर मग मी तुमचे पुढारीपण पत्करतो.

नानांच्या स्पष्टोक्तीमुळे जमावात चलबिचल झाली. काहीजण माघार घ्यायची भाषा करू लागले. तेव्हा तुकाराम सावंत नानांना म्हणाला,

: नाना, कोठारे लुटायची हा शेवटचा उपाय. त्याला आज मंडळींची तयारी आहे की नाही हे अजमावणे कठीण—पण लुटालूटीचा धोका न पत्करता आमचा प्रश्न सुटेल असा काही उपाय तुम्हाला सुचतो का ?

: तुम्ही ताठपणे माझ्यापाठीशी उभे राहणार असात तर तसाही उपाय आहे.

: तो कोणता ? सारे एकदमच गरजले.

: सांगतो. आता कॉंग्रेस सरकारचे

राज्य आहे. म्हणजे आपले राज्य आले आहे. या भागातल्या तुम्ही मंडळींनी दोन हजार सह्यांचा अर्ज माझ्याजवळ द्या. आपण सरकारजवळ खावटी मागू.

: हो, हो—आम्ही देतो सह्या. करा अर्ज. दोन हजार का चार हजार सह्या मिळतील.

: मग लागा त्या कामाला.


कै. बाळाहेब खेरांच्या नेतृत्वाखाली ३७ साली मुंबईला कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन झाले होते. कुलाबा जिल्ह्याच्या लोकलबोर्डाच्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या. कॉंग्रेसजवळ हमखास मते देणारी किसानांची संघटना बांधणे हा कार्यक्रमच नव्हता. नानांची संघटना त्यातून भक्कम पायावर उभी राहणार होती. लोकलबोर्डाकरता कॉंग्रेसतर्फे आचार्य ढवण यांच्या पत्नी सौ. दयाबाई ढवण या निवडणूक लढविणार होत्या. ही सारी परिस्थिती विचारात घेऊन दिवस रात्र गावोगाव फिरून नानांनी दोन हजार शेतकऱ्यांचा खावटी मागणारा अर्ज श्री. बाळासाहेब खेरांच्या नावे तयार केला आणि तो घेऊन ते अलिबागला भाऊसाहेब लेले, वामनराव लिमये, आचार्य ढवण या जिल्हाकॉंग्रेसच्या पुढाऱ्यांपुढे दाखल झाले. त्या मंडळींना जनतेची गरज पटली. 'हे केले तर समाज कॉंग्रेसच्या पाठीमागे उभा राहील. आजवर कुणी न ऐकलेली किसान संघटना कॉंग्रेसच्या झेंड्याखाली उभी राहील' हा नानांचा युक्तिवाद जिल्हा नेत्यांना पटला. कारण त्याकाळी कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिण भागात कॉंग्रेसला स्थान नव्हते. हिंदुमहासभा जोरात होती. शेतकरी कॉंग्रेसकडे वळविण्याची ही संधी साधली पाहिजे हे जाणून ती मंडळी खेरांकडे गेली. नानाही गेले. मंडळींची भूमिका खेरांना पटली. ते म्हणाले अर्थमंत्र्यांना विचारू या—

अर्थमंत्री अण्णाहेब लठ्ठे यांना बोलावणे गेले. ते आले, त्यांनी सर्व गोष्टी ऐकून घेतल्या व म्हणाले,

'दुष्काळ — खावटी — शेतकऱ्यांना कॉंग्रेसकडे वळविणे हे सगळे मुद्दे बिनतोड आहेत. पण आपल्याजवळ तशी तरतूद नाही. हा खर्च दाखवायचा कुठे?'

अण्णासाहेबांची समस्या खरी होती. त्यावर बरीच भवती न भवती झाली आणि मग असे ठरले की बाळासाहेबांनी आपल्या आखत्यारीत 'ग्रामविकासखाते' नामक एक नवे खाते निर्माण करावे व त्या खात्यामार्फत तगाई म्हणून दहा हजार रुपयांचे भात कुलाबा जिल्ह्यात वाटावे.

बाळासाहेबांनी नव्या खात्याला स्पेशल सँक्शन् दिले. आठ दिवसांवर गणपती आले होते. त्याआधी धान्य शेतकऱ्यांच्या पदरी पडणे जरूर होते. सँक्शन मिळाले—खाते निघाले—रक्कम मंजूर झाली तरी आठ दिवसांच्या आत ती महाडपर्यंत पोहोचून भात खरेदी करून शेतकऱ्यांच्या पदरात पडणे—केवळ अशक्य होते. आठ दिवसात सरकारी मदत! कुणी ना ऐकली होती वा पाहिली होती! पण नानांनी गणपतीपूर्वी खावटी आणतो असे शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते.


सांगायलाच्
हवं का?
SATHE MALTex BISCUITS
SATHE MALTex BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
रुचीला आगळीच-
वा! ही तर
साठे माल्टएक्स
बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेच या बिस्किटात आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली
माल्टएक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
heros'-SBC-49 C MAR

पण ते घडले. नवे खाते निघाले. एकट्या कुलाब्याला तगाई दिली असे भासू नये म्हणून आणखी ४१५ जिल्ह्यांना हजार हजार रुपये मंजूर झाले. कुलाब्याला १० हजार मिळाले. पैसे मंजूर झाले पण भात गणपतीपूर्वी कसे पदरात पडणार?

मग नाना महाड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कै. तुळजाराम मीठाशेठ यांच्याकडे धावले. त्यांचा तांदुळाचा व्यापारही होता. नानांनी त्यांना सांगितले,

: दहा हजार रुपये मंजूर झालेत हे तुम्हाला माहीत आहे भाई.

: होय.

: मग तुम्ही तेवढे तांदूळ ॲडव्हान्स करा मला. सरकारी पैसे आले की ते त्या तांदुळापोटी वळते करून घ्या.

तुळजारामभाई व्यापारी होते. तसेच समाजकार्यकर्तेही होते. काँग्रेसचे निष्ठावंत सेवक होते. त्यांनी नानांची विनंती त्वरित मान्य केली आणि नानांना तांदूळ दिला. गणपतीच्या दोन दिवस आधी तांदुळाच्या गाड्या भरून नाना बिरवाडी भागात गेले. रात्रंदिवस राबून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पन्नास-साठ गावातून शेतकऱ्यांना तांदूळ वाटले. चार-पाच हजार शेतकऱ्यांनी त्यावर्षीचे गणपती मोठ्या उत्साहाने साजरे केले. त्या गणपतीनेच जणू वाळणखोरे, वरंध खोरे, बिरवाडीचा परिसर या भागातील ५०।६० गावच्या शेतकऱ्यांनी नानांना पुढारी बनविले. आजतागायत या भागातली माणसे नानांचा शब्द म्हणजे देवाचा शब्द मानतात!

एकूणचाळीस साली काँग्रेस मंत्रिमंडळ गेले पण (खरंल डेव्हलपमेंट) ग्रामविकास खाते मात्र कायम राहिले! ☐

आता शेतकरी प्रत्येक बारीकसारीक कामाकरता नानांकडे येऊ लागले. कुणाकडूनही नानांनी कधी दिडकीचीही अपेक्षा केली नाही. दुष्काळाच्या संकटाला केव्हाही तोंड देता यावे म्हणून काँग्रेस सरकारची ग्रेन बँकर्सची कल्पना नानांनी महाड तालुक्यात उचलून धरली. शंकरभाई धारियांनी ग्रेनबँका स्थापन करण्याकरता नानांना दहा खंडी भात दिले. ते २५।३० खेड्यात वाटून नानांनी बँका चालू केल्या. त्यातून शेतकऱ्यांना धान्य मिळे. मणाचे सव्वामण परत करावे लागे. प्रत्येक बँक आपल्या गावाला पुरेसा साठा झाला की दुसऱ्या गावाला धान्याचे कर्ज देई. तिथे नवी बँक उभी राही. अशा शेकडो बँका महाड तालुक्यात उभ्या झाल्या. त्यांचे चोख हिशेब ठेवले गेले. १९४७ साली हिशेब घेतला तर शंकरभाईंनी दिलेल्या दहा खंडीचे सातशे खंडी भात झाले होते आणि ते गावोगावच्या शेतकऱ्यांना आधार देत होते! १९५१–५२ साली सरकारने रेशनिंग आणले आणि या ग्रेन बँका बंद केल्या. दुष्काळाशी मुकाबला करणारे, नानांनी जोपासलेले एक साधनच वेडेपणाने नष्ट केले?

पण हे सारे समाजकार्य चालू असता नानांच्या घरी दोन वेळा पोटभर जेवायला अन्न नसे. शेतकऱ्यांची संघटना मजबूत करण्याकरता ते गावोगाव फिरत

'स्वयंपूर्ण होऊ या. परकी राज्ये नष्ट करू या' असा संदेश देत. खोती-जमिनदारी नष्ट केली पाहिजे असा कानमंत्र लोकांना सांगत सकाळी बाहेर पडायचे. दिवसभर गावोगाव हिंडायचे कुणी जेवायला घातले तर जेवायचे. रात्री घरी परतायचे. रात्री घरीही जेवायला मिळाले तर जेवायचे. कारण घरची मंडळी नाराज होती. नातेवाईक रागावले होते. जमिनदार, खोत, गावातील प्रतिष्ठित मंडळी नाखूष होती. नानांचे घरच, घरातले किडुकमिडुक विकून गुजराण करीत होते. तरी हा बहकलेला पोरगा ताळ्यावर येईना, याची साऱ्यांनाच खंत वाटत होती. आई होती म्हणूनच नानांना अनेकवेळा रात्रीं तरी घरी जेवायला मिळे.

बंडूनाना जोशी, सदुभाऊ साठे, बाबुराव बापट ही गावातली प्रतिष्ठित मंडळी वारंवार नानांना हटकीत.

: नाना अरे तू हे काय चालिवले आहेस ? घराचा विचार कर. तू मुलगा कुणाचा ? तुझे घराणे केवढे प्रतिष्ठित ? तू कुणात मिसळतोस, कसा वागतोस, समाजाला पेटवणारी भाषणे काय करतोस, अरे तू कुऱ्हाडीचा दांडा ठरणार का ?

पण नाना ऐकून घेत. शब्द बोलत नसत. करायचे ते करायला सोडीत नसत. त्यांचा प्रचार वाढला तसा विरोधही वाढू लागला. १९३९–४० साली नानांना जबलपूरला नेऊन रेल्वेत स्टोअर क्लार्कची नोकरी देणारे दत्तोपंत जोशी पेन्शन घेऊन परत आले. त्यांनी भोरला घर केले पण ते वारंवार बिरवाडीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी येत. त्यांची बिरवाडीला सासुरवाडी होती. त्यांनी नानांना आर. एस. एस. मध्ये ओढण्याचा प्रयत्न केला. नानांनी ठाम नकार दिला.

: अरे पण कां ? संघ ही उत्तम संघटना नाही का ?

: आहे की. पण तिचा हेतू काय ?

: हिंदूंची संघटना करायची.

: कशा करता ?

: असे विचारायचे नाही.

: मला संघात यायचे नाही.

: मग काय करायचा तुझा विचार आहे ?

: खरे सांगू ? पुन्हा राष्ट्रीय आंदोलन उभे राहिले तर त्यात फक्त सत्याग्रही म्हणून भाग न घेता, या माझ्या शेकडो शेतकरी बांधवांचा मोर्चा महाडच्या कचेरीवर नेऊन ती कचेरी ताब्यात घेण्याचा माझा विचार आहे.

: वेड्या हे कसे शक्य आहे ?

: ते शक्य आहे. हे मी याड्या कृतीने दाखवीन. ¤

त्याच दरम्यान कॉंग्रेसमध्ये एस. एम. गोरे, मेहरअल्ली या मंडळींनी कॉंग्रेस सोशलिस्ट ग्रुप काढला होता. कुलाबा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष गजानन म्हसकर यांना एक दिवस गोऱ्यांनी विचारले.

: तुमच्या जिल्ह्यात किसान संघटना कुणी बांधली आहे का ?

: बिरवाडच्या नाना पुरोहितांनी

किसानांची मजबूत संघटना बांधली आहे.

: छान. नानांना पुण्याला पाठवा.

: पाठवतो.

पण नाना आजारी झाले होते. वेळी-अवेळी खाणे, उपास, मैलोगणती चाल उन्हा पावसातून शेता जंगलातून माण-साच्या शरीराने किती तग धरायचा? त्यांनी तसे गोऱ्यांना कळवले. पण गोऱ्यांनी त्यांना लिहिले–

: प्रकृती बरी नाही म्हणूनच पुण्याला या. इथे डॉक्टरांना प्रकृती दाखवू औषध पाणी इलाज करू. विश्रांती घ्या. चर्चा करू या. तुम्ही पुण्याला जरूर या. सर्व व्यवस्था मी करतो.

नाना पुण्यास गेले. पार्टी ऑफिसात राहिले. चर्चा झाल्या. औषधोपचार झाले. विश्रांतीही मिळाली. नानांचा व सोशॅलिस्ट ग्रुपचा कार्यक्रम एकच असल्याने गोऱ्यांच्या मताप्रमाणे नाना सोशॅलिस्ट ग्रुपचे सभासद झाले. दोन महिन्यांच्या पुण्याच्या मुक्कामात त्यांनी खूप वाचनही केले,

प्रकृती बरी झाल्यावर नाना परत बिरवाडीला आले. आल्याबरोबर कामाचा धडाका सुरू झाला. चाळीस साली मे महिन्यात त्यांनी बिरवाडला बिरवाडी विभाग शेतकरी परिषद संघटित केली. या परिषदेत कसेल त्याची जमीन करा. कुळांना संरक्षण द्या. असे अनेक ठराव पास झाले.

पण कूळकायदा येईपर्यंत न थांबता या सालापासून प्रत्येक कुळाने जिथे खंडीभर मक्ता असेल तिथे १४ मणच भात घालावे, म्हणजे अर्धलीऐवजी एक तृतीयांशच मक्ता द्यावा असा आदेश देण्यात आला आणि बिरवाडी भागात त्या सालापासूनच तो ठराव लागू झाला.

१९४१ साली वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. सरकारने जिकडे तिकडे बंदोबस्ती आदेश पाठविले. कुलाब्याच्या कलेक्टरानी नानाना नोटीस दिली. 'तुमचे कार्य शांततेला धोका आणणारे आहे. तुमच्या सभा बंद करा.'

सभांवर बंधने आली. लोक भडकू लागले. वातावरण तप्त झाले. खोता-सावकारांना बरे वाटले.

: नानाला, सरकारने बरा दट्ट्या लावला!

खोतांनी कुळावर जुलूम सुरू केले. त्याकाळी शेतकरी कुळे खोतांना फार घाबरत. खोतापुढे जाताना शेतकरी पायतणेही घालीत नसे. कचेरीत मामलेदारापुढे तर काय तो लोटांगणच घाली. पायलीभर धान्याकरता खोत दावे लावी, जप्त्या आणी. शेतकऱ्याची भांडीकुंडी बाहेर काढी. वर्षाला दोन महिने वेठ हा तर या भागातला शिरस्ताच होता. त्या काळात शेतकऱ्याला एकवेळचे जेवण खोताकडून मिळे. मजुरी नाही. शेतकऱ्यांच्या कोंबड्या, बकऱ्या, गाई, म्हशी यावरही खोताची सत्ता. तो मागेल तेव्हा कोंबडे नाहीतर बकरे त्याच्यादारी नेऊन हजर करावे लागे. लग्न निघाले तर पोरगी खोताने पसंत करायची. त्याची लग्नाला संमत्ती असणे

आवश्यक होते. कित्येकवेळा पहिला मान खोताचा असे. खोताने ‘ उद्या बायकोला कामाला पाठव ’ असे सांगितले तर नाही म्हणायची शेतकऱ्याची प्राज्ञा नव्हती. खोताने कामाला बोलावले आणि शेतकरी गेला नाही तर शिक्षा काय ? वीस मैल चालत जाऊन नारळाचे ओझे वाहून घेऊन यायचे ! कुळाने ठरलेले पेंढे दिले नाहीत म्हणून त्याला खोताच्या गोठ्यात म्हशीपुढे बांधून दिवसभर तोंडात पेंढा घेऊन बसायला लावल्याचे दाखले त्या भागात घडत.

असा हा दुर्बल, भेकड शेतकरी. त्यांची संघटना नानांनी बांधली. भडक भाषणे देऊन त्यांना कितीही चिथावले तरी महाड भागात शेतकरी उठाव होईल असे सरकारला कधीच वाटले


गाफिल राहू नका !
उद्याची काळजी
आजच घ्या !
बँक ऑफ बरोडात
खातें उघडा व बचत करा

तुमच्या प्रगतीचा सोपान
बँक ऑफ बरोडा

भारतात सर्वत्र आणि इंग्लंड, पूर्व आफ्रिका, मॉरिशस,
फिजी बेटे आणि गियाना या परदेशांतही
६२५ वर शाखांचे जाळे

नाही. खोतांनाही वाटले नाही. पण बिरवाडी खोऱ्यात नाना रात्रंदिवस राबत होते. शेतकऱ्यांना लढ्यासाठी घडवीत होते. ◻

महात्माजींचा सत्याग्रहाचा मार्ग समाजवादी गटाला दिवसेंदिवस असह्य वाटू लागला. या मार्गाने स्वातंत्र्य मिळेल अशी वाट बघत बसण्यापेक्षा सत्ता जबरदस्तीने हाती घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे समाजवादी नेत्यांना वाटू लागले होते. त्यामुळे ४२ साल उजाडता उजाडता समाजवादी गटाने, जिथे शक्य असेल तिथे तिथे असे प्रयत्न आपण केले पाहिजेत असा निर्णय घेतला. या निर्णयानुसार कुलाबा जिल्ह्यात कर्जत व महाड अशी दोन ठिकाणे असा प्रयोग करण्याकरता निश्चित करण्यात आली. आठ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्री गवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे जे अधिवेशन भरले होते त्यात चलेजावचा ठराव मांडायला खुद्द महात्माजी पुढे सरसावले. यावरून काँग्रेसी मंडळी किती चिडीला गेली होती याची कल्पना यावी. पण चलेजावचा ठराव झाला आणि रातोरात अनेक अखिल भारतीय नेत्यांची सरकारने धरपकड केली. नाना त्या काँग्रेसला गेले होते. ९ ऑगस्टला सकाळी कुलाबा जिल्हा काँग्रेसची मंडळी खेतवाडीत गुप्तपणे जमली. स्वातंत्र्याची चळवळ पुढे कशी चालवावी यावर खूप चर्चा झाली. या चर्चेत नानांनी प्रत्यक्ष उठाव करून जिल्ह्यातल्या कचेऱ्या कब्जात घ्याव्यात असे सुचविले. यावर भाऊसाहेब लेले म्हणाले.

: नाना, ही तुमची 'हूर' चळवळ आम्हाला पटत नाही. पण तुम्हाला ते जमत असले तर करा. आम्ही हा कार्यक्रम घेऊ शकत नाही.

सभा संपली. ज्याने त्याने, शक्य तो लपतछपत आपापल्या गावी जावे असे ठरले. मुंबईहून रेवसमार्गे निघालेली लेले-लिमये आदी काही मंडळी बंदरावरच पकडली गेली.

नानांनी महाड गाठले. गावात शिरल्यास अटक होण्याची भीती होती. म्हणून ते गांधार-नाक्यावर उतरले आणि रात्री खूप उशीरा बिरवाडीला घरी पोचले. उजाडायच्या आत त्यांनी वाळणखोऱ्यातला खेडेगाव जवळ केला. दिवसा, रात्री, बेरात्री नाना खेडोपाडी हिंडत होते. गुप्त सभा घेत होते. भाषणे करीत होते.

'ब्रिटिश सरकार आपल्याला उलथून पाडायचे आहे. त्याकरता आपल्या भागाचा हिस्सा म्हणून आपल्याला महाडची मामलेदार कचेरी व खजिना ताब्यात घ्यायचा आहे. ही लढाई आहे. काठ्या, सोटे याशिवाय आपल्याजवळ शस्त्रे नाहीत. सरकारी पोलिसांजवळ बंदुका, पिस्तुले असणार. गोळीबारही होणार. पकडले जातील त्यांना जन्मठेपीच्या शिक्षाही होतील. स्वातंत्र्यलक्ष्मी खेचून आणण्याचे हे सतीचे वाण हाती घ्यायची ज्यांची हिंमत असेल त्यांनी माझ्या झेंड्याखाली यावे.'

नाना ठिकठिकाणी स्पष्ट कल्पना देत

होते. पावसापाण्यातून, नदीनाल्यातून, शेताच्या बांधावरून काळोख्या रात्री दारी ठाकणाऱ्या उपकारकर्त्याचा शब्द कुठेच खाली पडत नव्हता. घरटी किमान एकेक जवान नानांच्या क्रांतिकारी मोर्चात सामील व्हायला तयार होत होता. नाना माणसे निवडीत होते. पारखून घेत होते. त्यांची हिंमत तपाशीत होते.

हरी पवार, तुकाराम सावंत,जयराम उपाध्ये, लक्ष्मण तरे, रामभाऊ काळगुडे, सखाराम भगत, धोंडू पाटील, तुकाराम धंबरकर, धोंडू साटम, गजानन सोलम, रंगू कडू, विठ्ठल चांभार, सखाराम पाटील, बारकू वरवटकर, भिवा पवार, चेंड्या मिस्त्री, भिवा खेतल, भिवा तटकरे, टिकमभाई मेहता असे अनेक जिवाला जीव देणारे सवंगडी नानांभोवती जमले. प्रचाराला धार आली. ही सारी माणसे शिक्षित नव्हती, नव्हे बहुतेक अशिक्षित होती. पण नानांवर त्यांचा जबरदस्त विश्वास होता. म्हणूनच ती मंडळी आपल्या संसारावर निखारे ठेवून त्या अग्निदिव्याला तयार झाली ! ◻

१० सप्टेंबर १९४२ हा दिवस मोर्चाकरता नक्की करण्यात आला होता. ती अमावास्या होती. पण स्वातंत्र्याची पहाट तीच उजळ करील अशी नानांची आणि त्यांच्या साथीदारांची खात्री होती.

१ सप्टेंबरला समाजवादी गटाची पुण्याला गुप्त बैठक झाली. गटाच्या जहाल कार्यक्रमात भाग घेणारांची यादी त्या सभेत तयार झाली. ठिकठिकाणी आखलेल्या जहाल कार्यक्रमाकरता माणसांची निवड करून त्यांना पाठविण्यात आले. महाडच्या मोर्चासाठी पुण्याहून वसंत दाते, वसंत नगरकर, दोसी, राजाभाऊ चांदोरकर, शरद देडीज, अच्युत केळकर, आपटे, जमखिंडीकर या मंडळींची निवड झाली होती. मोर्चाच्या आधी चार दिवस बिरवाडी व शेलटोली या गावांच्या मध्यावर असलेल्या मामा उपाध्यांच्या वाड्यात नानांनी मोर्चा-बेस-कॅंप ठेवला होता. तिथे याद्या तयार झाल्या. अनेकांना परत बोलावून त्यांची नावे मोर्चासाठी नक्की करण्यात आली. गावोगावी प्रचारक जाऊन आले. पांडू खोत देशमुखांनी कॅंपला धान्यपुरवठा बिनबोभाट केला.

८ सप्टेंबरला अचानक बातमी आली, की पोलिसांना नानांच्या बेताचा सुगावा लागला असून कॅंपचाही ठावठिकाणा समजला आहे. ते नानांना व त्यांच्या साथीदारांना पकडण्यासाठी येत आहेत. बातमी समजताच नाना आणि त्यांचे सर्व सहकारी रानात पांगले. पोलीस कॅंपवर पोचले तेव्हा त्यांना तिथे विझलेल्या चुली आणि विखुरलेली भांडीकुंडी सापडली. कॅम्प वाळण खुर्दला हलविला गेला होता. पोलीस तिथे पोचणे अशक्य होते. वाळण खुर्दच्या भागातील मंडळींनी ९ तारखेला रात्री ९ वाजता निघायचे असे संदेश गेले. त्याच दिवशी रात्री इतर सर्व भागातील

माणसे शेलटोली-बिरवाडीच्या मध्यावरील मामा उपाध्यांच्या वाड्यावर जमायची असेही कळविले गेले. पुण्याची मंडळी ९ तारखेला नानांना येऊन मिळाली.

दिनांक ९ सप्टेंबर १९४२. रात्री ९ वाजता सारी मंडळी वाळणखुर्द कँपवर जमली. रात्र काळोखी होती. दिवस पावसाळी होते. गाडी रस्त्याने जाणे धोक्याचे होते. त्यामुळे डोंगरी पायवाटेने ती सारी मंडळी रात्री १२ वाजता शेलटोली कँपवर पोचली. तिथे इतर भागातली मंडळी आधीच जमली होती. तयारीनेच आली होती. नानांच्या झेंड्याखाली, त्या रात्री किमान पाचशे अशिक्षित शेतकरी 'मारू किंवा मरू' या निर्धाराने जमा झाले होते.

कँपवर पुन्हा सभा झाली. सर्वांना आपण काय करीत आहोत, त्याचे परिणाम काय होतील याची कल्पना देण्यात आली. गोळीबार, शिक्षा, मारहाण कशालाही न डगमगता वाट्टेल त्या प्रसंगाला तोंड द्यायची हिम्मत बाळगा असे साऱ्यांना सांगण्यात आले. अच्युत केळकर म्हणाले—

: लोकमान्य विलायतेला गेले तेव्हा गोविंदाग्रजांनी एका कवितेत जे विचार व्यक्त केले तेच विचार आपणही आज मनी वागविले पाहिजेत. गोविंदाग्रजांनी लिहिले—

नलगे दौलत, नलगे बरकत,
नको कोहीनूर।
स्वदेश नलगे, स्वराज्य नलगे,
सर्वचि हो दूर।
एक सांगण, एक मांगणे,
एक लाखवार।
घेऊनि यावी, श्रीशिवबाची,
भवानी तलवार २ ॥

आपण शिवरायाच्या खोऱ्यातले त्याचे पाईक आहोत. आपल्याला आपले परदेशी गेलेले स्वातंत्र्य खेचून परत आणायचे आहे.

अच्युतरावांच्या भाषणाचे 'महात्मा गांधी की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी स्वागत झाले. रात्री १२॥–१ च्या सुमारास मोर्चाने कँप सोडला. डोळ्यात बोट घातले तरी दिसू नये असा मिट्ट अंधार सर्वत्र भरला होता. पावसाने पायाखालची वाट चिखलाने रबरबीत केली होती. मुख्य वाट सोडून शेतातल्या पायवाटांनी मार्ग कापावा लागत होता. काळोखातच नाले-ओहोळ ओलांडावे लागत होते. पाचशे-सहाशे माणसांचा समुदाय गुपचुप वाट तुडवीत होता. तीन-साडेतीन तासांच्या पायपिटीनंतर महाडपासून तीन मैल असलेल्या नडगाव या गावच्या देवळात पहाटे ४ वाजता मंडळी पोचली. तिथे तास दीड तास विश्रांती घेण्यात आली. तिथे पुन्हा एकदा साऱ्यांना बजावण्यात आले, गोळ्या, बेड्या, मारपीट यांना तोंड देण्याची हिंमत हरली असे ज्यांना अजूनही वाटत असेल त्यांनी परत जावे. जरा पुढेमागे करून ७।८ लोक जायला निघाले. त्यांना परत जाऊ देण्यात आले.

सकाळी सहा वाजेपर्यंत नडगावच्या देवळात विश्रांती घेऊन मोर्चा लायनीत

उभा राहिला. महात्माजींचा, शिवाजी महाराजांचा जयजयकार करून महाड-कडे निघाला. वास्तविक आजच्या लढाईचे तंत्र म्हणून नाना, पुण्याहून आलेली कार्यकर्ती मंडळी, नानांचे येसाजी तानाजी ही मंडळी मोर्चाच्या मागे हवी होती. पण 'गोळचा खायच्या-वेळी नेते मंडळी मागे राहिली, अशिक्षित शेतकऱ्यांना त्यांनी तोफेच्या तोंडी दिले,' हा प्रवाद येऊ नये म्हणून म्हणा, किंवा या देशातल्या लढाईत नेत्यानेच 'हरहर महादेव' म्हणून पुढे सरसावायचे आणि मग इतरांनी शत्रूवर तुटून पडायचे, ही पद्धतच असल्यामुळे नाना व पुणेकर मंडळी आघाडीवर होती.

मोर्चा घोषणा देत शेडावला श्री. गाडगीळ यांचे घराजवळ आला इतक्यात महाड-वाई ही लायल कंपनीची खाजगी सर्व्हिसची गाडी समोरून आली. मोर्चाने तिला थांबवली. नाना पुढे झाले. ड्रायव्हरला म्हणाले,

'आज १० सप्टेंबर हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून आम्ही ठरवला आहे. आज गाडी बंद. आज तुम्ही गाडी वाईला नेऊ नये.

शेपाचशे माणसांचा मोर्चा, त्यांच्या घोषणा यांनी गाडीतले पॅसेंजर्स गडबडून गेले. ड्रायव्हरही गडबडला पण अवसान एकत्र करून म्हणाला,

: तुम्ही गाडी थांबवलीत. मला काहीच म्हणायचे नाही. पण फ्रंट सीटला अण्णासाहेब सावंत बसले आहेत. हे माहीत आहे का तुम्हाला?

: कोण अण्णासाहेब? असे म्हणत नाना गाडीशी गेले. दार उघडून फ्रंट सीटवर बसलेल्या श्री. सावंत नामक रेव्हिन्यू अवल कारकुनाला (कुलाबा जिल्ह्यात या पदावरील माणसाला 'अण्णासाहेब' म्हणतात) त्यांनी हात धरून खाली उतरविले.

: तुम्ही महाड कचेरीतले अण्णासाहेब का?

: हो.

महाडची मामलेदार कचेरी ताब्यात घेण्याकरता आम्ही निघालो आहोत. तुम्ही आमच्या मोर्चात सामील व्हा.

: मी–मी सरकारी नोकर–मला कसे सामील होता येईल?

: तुम्ही आला नाहीत तर आम्ही जबरदस्तीने तुम्हाला खेचून नेऊ.

सावंतांनी खूप आढेवेढे घेतले पण मग नाईलाजाने ते तयार झाले. सावंतांना मग गांधी टोपी चढविण्यात आली. हाती तिरंगा देण्यात आला. त्यांच्या दंडाला दोरीच्या काढण्या बांधून त्या धरून दोघेजण त्यांच्या बरोबर चालू लागले. मोर्चा पुढे निघाला. आणखी दोन फर्लांगाचे अंतर तोडल्यावर मोर्चाला तीन माणसे भेटली. नानांनी त्यांना दमात विचारले,

'कोण तुम्ही? सारे गडबडले–म्हणाले–

मी–मी–सर्कल ऑफिसर आहे रेव्हिन्यूचा.

मी–बेलीफ आहे–साहेब,

मी तर शिपाई आहे.

कुठे निघालात?

जप्तीला.

आज स्वातंत्र्य दिन आहे. कचेरी कब्जात घ्यायलाच आम्ही निघालो आहोत. चला, मोर्चात सामील व्हा. भराभर त्यांच्याही माथी गांधी टोप्या चढल्या. हाती निशाणे दिली गेली. दंडात काढण्या पडल्या. त्यांना अटक करून मोर्चा पुढे चालला. सात सव्वा-सात वाजता मोर्चा गावात शिरला. पोस्टाशी पोचला. (आज त्याला जुने पोस्ट म्हणतात. पोस्ट ऑफिस आता चवदार तळ्यावर हलले आहे.) तिथे पोचल्यावर मोर्चाने प्रथम टेलिग्रॅफच्या तारा तोडून टाकल्या. घोषणा वाढल्या होत्या. गाव भयभीत झाले होते. नाना, मामा उपाध्ये आणि लक्ष्मण दुधाने पोस्टात शिरले. पोस्टमास्तर अंबिके हे त्या इमारतीत कुटुंबासह रहात होते.

: मास्तर, तुम्ही कुटुंबासह इमारतीतून बाहेर पडा. आम्ही पोस्ट जाळणार आहोत.

स्वयंसेवकांनी रॉकेलचा डबा व बोळे आत आणलेले पाहून मास्तरांची बोबडी वळली. इतर कारकून मंडळी पळाली–घाईघाईने मास्तर कुटुंबासह बाहेर पडले. ठिकठिकाणी रॉकेल ओतून आग लावण्यात आली. काही उत्साही मंडळी पोस्टाची तिजोरी फोडण्याच्या विचारात होती. नानांनी त्यांना मना केले. 'हे आपले उद्दिष्ट नाही' असे बजावले.

एवढ्यात २५ लाठीधारी पोलीस घेऊन मांढरे नावाचे फौजदार तिथे आले आणि त्यांनी जमावावर लाठी-हल्ला सुरू केला. पण मोर्चातील शेतकरी गड्यांजवळही लाठ्या होत्या. त्यांनी जोरदार प्रतिकार केला. पाच दहा मिनिटांच्या हातघाईच्या लढाईत १०-१५ पोलीस जखमी होऊन आडवे झाले. ५-१० वाट फुटेल तिकडे पळाले. दोघे तिघेजण मांढरे यांच्या अंगावर धावले. नानांचे लक्ष होते. ते मांढऱ्यांजवळ गेले. त्यांनी आपल्या लोकांना थांबविले. म्हणाले,

: मांढरे, आम्ही तुम्हाला मारीत नाही. तुम्ही मोर्चात सामील व्हा.

फौजदाराच्या डोक्यावर गांधी टोपी चढली. दंडावर काढण्या रुतल्या. पोस्टाच्या रणधुमाळीत गावातले कृष्णा हेलेकर, तुकाराम पानसरे यांच्यासारखे वीर नानांना येऊन मिळाले. नानांनी मोर्चा पुढे हाकारला. 'कचेरी हे आपले उद्दिष्ट आहे–पुढे चला.'

पोस्ट जळत ठेऊन मोर्चा पुढे निघाला. घोषणा आकाशाला भिडत होत्या. बाजारपेठ बंद झाली होती. डोंगरी पुलाजवळ कमलाकर दांडेकर नावाचा महाडच्या शाळेतील मॅट्रिकच्या वर्गातला विद्यार्थी या स्वातंत्र्य मोर्चात सामील झाला. डोंगरे पुलाजवळ नाना मोर्चाला उद्देशून म्हणाले,

: आता सावधान. पुढल्या मार्गांत गोळीबार होण्याचा संभव आहे. तेव्हा एक गोष्ट ध्यानात घ्या. हे अण्णासाहेब, सर्कल, बेलीफ, फौजदार–ज्यांना आपण गिरफदार केले आहे त्यांना पुढे करून आपण चाल करायची. गोळीबार झाला तर प्रथम या सरकारी अधिकाऱ्यांचे मुडदे पडले पाहिजेत. त्यांना पुढे करा.

ही काळजी घ्यायलाच हवी होती. विठोबाच्या देवळाशी पोलीस टिपण साधून बसले होते. त्यांना गोळ्या चालविण्याची आज्ञा होती. लाठी विरुद्ध गोळी हा असमान सामना शेतकरी मंडळींना जिंकणे कठीण होते.

जमाव मच्छीमारीच्या कोपऱ्यावर आल्यावर नानांनी आज्ञा सोडली—

: आता 'हरहर-महादेव' म्हणून एकदम पुढे सरा. पोलिसांच्या बंदुकीत दोनदोन काडतुसे असतील. पण ती संपली की दुसरी काडतुसे भरायला त्यांना सवड मिळता नये.

या आदेशाबरोबर एकदम तो ५-६ शे लाठीधारी मंडळींचा मोर्चा धावत सुटला. जमाव बराच पुढे आल्यावर पोलिसांनी भयंकर गोळीबार सुरू केला. बायोनेटसुही चालविली. पण ज्याने गोळी झाडली तो पोलीस परत गोळी झाडायला उठला नाही. जमावाने प्रत्येकाला बेदम चोपून काढले. जमावाच्या चढाईत अटक केलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुढे राखणे शक्य झाले नाही. त्यामुळे अण्णासाहेब सावंताशिवाय कुणीही अधिकारी गोळीबारात जखमी झाला नाही.

पोलीस आडवे झाले. ६ बंदुका नानांच्या ताब्यात आल्या. आणखी पोलीसच जाग्यावर नव्हते. त्यामुळे विठोबाच्या लढाईचा आढावा नानांनी घेतला तो असा—

नथू टेकावला, अर्जुन भोई, वसंत दाते, कमलाकर दांडेकर आणि अण्णासाहेब सावंत ही मंडळी जागच्याजागी ठार झाली होती. अच्युत केळकर, रामभाऊ कालगुडे गोळ्यांनी जखमी झाले. आणखी काही बायोनेटांनी भोसकले गेले होते. जखमींवर उपचार करायला हवे होते. काय करावे या विचारात नाना असताना—(कै.) डॉ. चितळे व डॉ. डिंगणकर ही अश्विनीकुमारांची जोडी धोका पत्करूनही आपणहून तिथे धावून आली. जखमींवर त्यांनी त्वरित उपचार केले त्यामुळे त्यातले कुणीच दगावले नाहीत.

मोर्चात असलेले हुतात्म्यांचे नातेवाईक रडू लागले. गावातली मंडळीही जमली. नाना त्यांना म्हणाले, ही लढाई आहे. इथे पडला त्याचा शोक करीत न बसता आपल्याला पुढे जायचे आहे.

एवढ्यात इन्स्पेक्टर ढवळे पिंपळपाराशी आले. पिस्तुल रोखून ते पुढे सरसावत आहेत हे पाहिल्यावर जमावाने त्यांच्यावर बंदुका रोखल्या. त्या पाहून तो शूर गृहस्थ! सायकल पिंपळपाराशीच टाकून जो पळाला तो गवळआळीत घुमाळांच्या गोठ्यात लपला! मोर्चेवाल्यांनी त्याचा पाठलाग केला पण तो सापडला नाही. कारण घुमाळांनी म्हशीच्या गवाणीत ढवळ्यांच्या अंगावर पेंढे टाकून त्यांना लपवून ठेवले होते!

इतक्यात महाडचे मामलेदार कित्तुर पिंपळपाराशी आले. नाना भराभर आज्ञा सोडीत होते. तेव्हा तोच या दंगलीचा नेता आहे असे ओळखून ते नानांपाशी आले. म्हणाले,

: काय हो, ही गांधींची चळवळ

आहे का ?

: तुम्ही कोण ?

: मी कित्तुर.

: पण तुमचा हुद्दा काय ? कोण म्हणून तुम्ही हा प्रश्न मला विचारता आहात ?

: मी महाडचा मामलेदार आहे.

ते वाक्य ऐकल्यावरोबर नानांनी कित्तुरांचा हात पकडला. म्हणाले,

: आम्ही तुम्हाला अटक केली आहे.

कित्तुर काहीच बोलले नाहीत. नानांनी त्यांना पितांबर भिकुदास गांधी यांच्या दुकानी नेले. म्हणाले,

: वसा. आमचा तुरुंग वाळणला आहे. तिकडे तुम्हाला घेऊन जाणार आहोत. तुम्ही महाडचे मामलेदार आहात. तेव्हा तुम्हाला घेऊन जायला कुणाची तरी गाडी बोलावून घ्या.

कित्तुर शांतपणे म्हणाले—

: आता मी मामलेदार नाही. तुमचा कैदी आहे. आता तुम्हीच मामलेदार. तुम्हीच गाडी बोलवा आणि मला कुठे ते पाठवा.

त्यांचा शांतपणा चक्रावणारा होता.

इतक्यात बातमी आली—सशस्त्र पोलिसांची एक तुकडी माणगावहून महाडात येत असून त्यांनी गांधार नाक्यापासूनच गोळीबार करायला सुरुवात केली आहे. बंदुकांचे ठो ठो असे आवाजही ऐकू येऊ लागले. पोलिसांनी आणलेल्या या नव्या कुमकेला तोंड देणे कठीण होते. आणखी काही माणसे गमावण्यात अर्थ नव्हता. त्यामुळे मामलेदारांना गांधींच्या दुकानीच सोडून नानांनी आपल्या लोकांना आज्ञा दिली—

: सर्वांनी, जमेल तसे, लपतछपत महाड सोडावे. संध्याकाळपर्यंत कँपवर जमावे. तिथे पुढल्या सूचना मिळतील.

दुपारचे अकरा वाजले होते.

आज्ञा मिळताच माणसे पांगली. नानाही आडवाटेने निघाले. पुण्याच्या मंडळींनी रायगडमार्गे पुण्याचा रस्ता धरला. दुपारी अडीच-तीनपर्यंत नाना शेरटोली कँपवर पोचले. संध्याकाळपर्यंत तिथे पंचवीस लोक जमले. दुसऱ्या दिवशी ती संख्या २०० च्या घरात



गेली. नानांनी सुरक्षितता म्हणून शेर-टोलीच्या डोंगरावर कँप हलवला. पुढे काय, हा विचार चालू व्हायच्या अगोदर बातमी आली,

डी. एस्. पी. खोत १०१९ ला सायंकाळी महाडात आले. त्यांनी मोर्चाची चौकशी केली. विचारले,

: मोर्चात किती माणसे होती ?

: पाचशे.

: मग पाचशे लोकांना लगेच अटक करा.

धरपकडीचे सत्र सुरू झाले.पोलिसांनी महाडातल्याच अनेक मंडळींना पकडले. ती मंडळी मोर्चात सामील झाली नव्हती. पण पोलिसांच्या दमाला वा छळाला बळी पडून त्यांनी माफीही मागितली नाही, कुणाची नावेही सांगितली नाहीत. अकरा तारखेला गावात मिलिटरी आली. त्यामुळे धर-पकडीचे सत्र आजूबाजूच्या गावात आणि बिरवाडी-वाळण खोऱ्यातही पोचले. नानांची अनेक माणसे पकडली गेली. दुसऱ्या हल्ल्याची तयारी विझून गेली. नानांना पकडण्याकरता दहा हजार रुपयांचे बक्षीस जाहीर झाले ! नाना हाती न लागले तर 'शूट अॅट साईट' अशी लष्कराला व पोलिसांना आज्ञा मिळाली.

आता वाळण खोऱ्यातून 'गुप्त' होण्यावाचून नानांना इलाज नव्हता.

नानांच्या अज्ञातवासाचे ते पर्वही विलक्षण, कादंबरीपेक्षाही विचित्र आहे.

● ●

---

पुण्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या एका बिननेहमीसारख्या समारंभात, पुण्याचे एक श्रीमंत नागरीक बाळा-साहेब नाईक यांनी आपल्या साळूराम पंजाबी या नोकराच्या स्मृतीप्रीत्यर्थ एका स्थानिक इस्पितळाला रुग्णोपयोगी साधनसामग्रीची भेट दिली.—साळूराम नाईक घराण्याच्या सेवेत आला तो मोतद्दार म्हणून. पण पुढे, अंगच्या हुशारीमुळे आणि मालकांच्या प्रोत्सा-हनामुळे, तो अनेक प्रकारची कामे करू लागला; त्यांच्या कुटुंबातलाच एक होऊन गेला.

आम्हालासुद्धा आमच्या घरात एखादा साळूराम असता तर आवडले असते; मात्र त्यासाठी नाईक व्हायची आमची तयारी नाही. ¤

मॉंट्रियल येथे भरलेल्या दहाव्या व्यंगचित्र-प्रदर्शनात व्हँकुव्हरच्या रॉय पेटर्सन या व्यंगचित्रकाराला ५००० डॉलर्सचे पहिले बक्षीस मिळाले आहे. विश्वमताला न जुमानता फ्रान्सने प्रशांत महासागरात चालवलेल्या अण्वस्त्र चाचणीवर या व्यंगचित्राचा रोख आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज पाँपिदु हाती कॉर्कस्क्रू घेऊन, अणुबॉंबच्या आकारा-तील मद्याची एक बाटली उघडायला तयार आहेत, असे त्या व्यंगचित्रात दाखवले आहे. ¤

---

# शतपावली

पृष्ठ १६ वरून

वातावरणातल्या म्हणून आवडू लागल्या. संपादक दिडक्या मोजून त्या प्रसिद्ध करू लागले.

भाग्यचक्र फिरू लागलं.

संपादकांनी त्याच्याकडे युद्धवार्तापत्राची मागणी केली. तो दक्षिण आफ्रिकेतल्या आघाडीवरून युद्धाच्या सनसनाटी हकीगती लिहून पाठवू लागला. वाचक त्या चवीने वाचू लागले. हळूहळू त्याला फौजेतलं काम मामुली वाटू लागलं. वर्तमानपत्री लेखनाच्या कंत्राटी कामाने चित्ताचा कबजा घेतला. सनसनाटी लिहिलं तर वाचकांच्या झुंडी जमतात. संपादक खूष होतात. मानधनाची रक्कम आपल्या दिशेने वाहू लागते. खिशात पैसा खुळखुळू शकतो. न्यारा नवीन शोध!

भाग्य चक्र फिरू लागलं.

मस्तकात एक सणक आली. राजीनामा द्यावा आणि हाती लेखणी घेऊन पहावी. फौजेतल्या चाकरमानेगिरीला रामराम ठोकून तो सरळ दक्षिण आफ्रिकेतल्या वृत्तपत्रात वार्ताहर म्हणून चिकटला.

त्याच्या साऱ्याच वार्ता खळबळजनक! वाचक पुढच्या अंकाची वाट बघू लागले. एडी निरोप्याचा आता युद्धवार्ताहर एडगर वॉलेस झाला होता.

भाग्यचक्र फिरू लागलं.

एक पैसेवाला देवानेच पाठवल्यासारखा सामोरी आला. 'म्हणाला, ' मी नवं वर्तमानपत्र काढतो. तुला मुख्य संपादक करतो. काळजी करू नकोस. तू फक्त सनसनाटी लिही. पैसेच पैसे मिळतील. वॉलेस ही संधी दवडणार? वार्ताहराचा तो थेट मुख्य संपादक झाला! घोड्यांच्या रेसेस त्यावेळी फार फॉर्मात होत्या. घोड्यांवर पैसे लावून श्रीमंत होता येतं ह्यावर वॉलेसचा बालंबाल विश्वास होता. तो स्वतः तर घोड्यावर पैसे लावायचाच पण त्याने रेसिंग टिप्सच प्रसिद्ध करण्याचा धडाका लावला. वाचकांची मस्तकं फिरली. अंकाला भरमसाट मागणी आली. वॉलेस गबर झाला. त्याच्या दोन हाताचे चार हात झाले. रेसेसचे घोडे काढून द्यावेत; सनसनाटी बातम्या रंगवून सांगाव्यात; बायकोला घेऊन सफरी कराव्यात. भरपूर पैसे मिळवावेत. खावं, प्यावं, मौजमजा करावी. हे नवं खुशालचेंडूचं जीवन तो जगू लागला.

भाग्यचक्र फिरायचं असलं म्हणजे किती अकल्पित गतीनं फिरतं त्याचा हा मासलेवाईक नमुना. सगळी सुखं त्याच्या पायापाशी मांजरासारखी येऊन उबेला बसली. त्याच्या जगाचा तो स्वामी झाला. म्हणजेच, अगदी हद्द झाली.

आणि भाग्यचक्र फिरायचं नसलं म्हणजे ते कसं एकाच जागी खडकासारखं घट्ट रोवून बसतं ह्याचा नमुनेदार प्रत्यय म्हणजे आसभास नसतांना कायद्याच्या कचाटयात सापडून एका

आफ्रिकन सकाळी वॉलेसची रुबाबदार नोकरी गेली हे होय ! नोकरीत मिळालेले सगळे पैसे वॉलेसने छानछोकीत उधळले होते. गाठीशी दिडकी नव्हती अत्तराचे दिवे जाळले त्याच्या फक्त आठवणी तेवढ्या तेवत होत्या.

सुखसमृद्धीची पहाट दाखवलेल्या दक्षिण आफ्रिकेचा गुपचूप निरोप घेऊन पत्नीसहीत वॉलेस निष्कांचन अवस्थेत लंडनच्या धुक्यात हजर झाला !

संपादकपदावरून डच्च्यू मिळालेल्या कफल्लक लेखकाला लंडनमध्ये कोण धूप घालणार होतं ?

त्याचे खायचे वांधे झाले. म्हणजे, दुधाचा रतीब घालताना तो जिथे होता, तिथेच दैवाने त्याला पुन्हा आणून सोडलं ! फरक फक्त एकच होता. दुधाचा रतीब घालताना त्याला मागे वळून बघावं असं काहीही रम्य पूर्वदिव्य नव्हतं. असलाच तर सगळा चोरटेपणाचा कुंद काळोख होता. आता पंचवीशीच्या उंबरठ्यावरून मागे वळून पहाण्यात कैफ होता. एक नवं खंड त्याने तुडवलं होतं; एक युद्ध खेळलं जात असताना त्याने पाहिलं होतं; निग्रोंची अमानूष पिळवणूक पाहून त्याला वाचा फोडली होती; गुन्हेगारांचं जंगलातलं छुपं जग पाहिलं होतं; बातम्या खुलवणं ही काय विद्या आहे नि वर्तमानपत्र चालवणं हा काय झपाटा आहे हे त्याला स्वानुभवाने कळलं होतं; अश्वशक्तीतलं चैतन्य त्याने न्याहाळलेलं होतं; लाखाचे बारा हजार कसे होतात नि पाचाचे पंचावन्न कसे होतात हे त्याने जाणलं होतं; गृहस्थाश्रम म्हणजे काय तो तर त्याचा अनुभवच होता. पिंपळ सळसळावा तसं त्याचं तारुण्य रोचक अनुभवांनी समृद्ध होऊन सळसळत होतं.

पण त्याला नोकरी मिळेना !

त्याने आता दोन आघाड्यांवर बाजी मारायचं ठरवलं. रेसिंग टिप्स द्यायच्या आणि फावल्या वेळात सपाटून कादंबरीलेखन करायचं. कादंबऱ्यात प्रेमबीमं घुसडायचं नाही. कादंबऱ्या म्हणजे रहस्यकथा, रहस्य मांडायचं नि वाचकांना सोडवायला सांगायचं. त्या निमित्ताने रहस्यपूर्तीच्या स्पर्धा लावायच्या. बक्षिसं वाटायची. पर्यायाने कादंबऱ्यांचा खप वाढवायचा. पैसे मिळवायचे. इतके की कसली ददात म्हणून उरणार नाही.

त्याने लंडनच्या वृत्तपत्रात रेस टिप्स प्रसिद्ध करायला प्रारंभ केला. वाचकांनी त्या केवळ उचलूनच धरल्या असं नाही तर चक्क तुफान केलं. वॉलेसच्या अंदाजांना भयंकर बाजारभाव येऊ लागला. वॉलेस घोड्याचं नाव सांगतो कधी नि आपण त्याच्यावर पैसे लावून लखपती होतो कधी असं वाचकांना झालं. वॉलेस म्हणजे शर्यतीचा घोडा हे समीकरणच झालं. वॉलेसला भरपूर पैसे पुनरपि मिळायला लागले.

शर्यतींच्या अचूक अंदाजांचं ठीक आहे पण कादंबरी लेखनाचं काय ?

तिथे त्याचा संपूर्ण त्रिफळा उडाला ! त्याने रहस्यपूर्तीच्या रोख बक्षीसांच्या स्पर्धा जाहीर केल्या. त्या सपशेल

अंगाशी आल्या. अखेर निरुपाय होऊन त्याने उक्त्या सत्तर पाऊंडाला एक, ह्या किरकोळ दराने कादंबऱ्यांची हस्तलिखितं प्रकाशकांना सर्व हक्कांसहीत विकायला सुरुवात केली. व्यापाराची ही रीत मात्र चांगलीच फळाला आली. रहस्यमय कादंबऱ्यांचा घाऊक कर्ता म्हणून त्याचं नाव गाजू लागलं माणसाच्या मनात असलेली सूडाची भावना आणि तिच्या पूर्तीसाठी माणूस कावेबाजपणे रचीत असलेल्या कृष्णकारस्थानाचा सापळा, हा त्याच्या कादंबऱ्यांचा एकमेव विषय.

हा विषय त्याने दीडशे रहस्यांकित कादंबऱ्यातून पिंज-पिंज पिंजला!

दीडशे कादंबऱ्या?

हो! एडगर वॉलेसने पंचवीस ते पन्नास ह्या वयात लागोपाठ दीडशे रहस्यमय प्रदीर्घ कादंबऱ्या लिहिल्या! शिवाय शेकडो कथा लिहिल्या त्या वेगळ्याच! शिवाय वृत्तपत्रांसाठी खास वार्ताहर म्हणून देशोदेशी भ्रमण करून सनसनाटी वार्तापत्रं लिहिली. कॅनडा, अमेरीका, युरोप, अशी त्याची पायपीट चालू होती.

जोडीला आणखी नाटकं लिहिण्याचा आखाडा त्याने उघडला.

लेखनाचा हा राक्षसी प्रपंच त्याने कसा केला? केव्हा केला?

ह्याचं पहिलं श्रेय नियतीला दिलं पाहिजे. कारण सृष्टीने त्याला पोलादी प्रकृती बहाल केलेली होती. तो नुसता धट्टाकट्टाच नव्हे, तर धिप्पाडही होता. पाच-सहा तास झोप घेतली की त्याला पुरे होई. शिवाय दमल्यासारखं वाटलं तर दिवसाच्या कुठल्याही प्रहरी तो खुर्चीत, बसल्या बसल्या पाच-दहा मिनिटांची डुलकी काढून लागलीच ताजातवाना होऊ शकत असे. झोपेवर त्याची पूर्ण हुकमत होती. झोप वजा करता उरलेला संपूर्ण वेळ तो लेखनात वेची. त्याने हस्तलिखितांचा सागर निर्माण केला. इतकं लेखन स्वहस्ते करणं त्याला शक्यच नव्हतं. म्हणून तो सर्व कथन यंत्रावर ध्वनिमुद्रीत करायचा. नंतर त्याचा लेखनिक येवून तोंडी सांगितलेला तो सर्व मजकूर कागदावर नकलायचा. अशा रितीने त्याची हजारो हस्तलिखितं तयार झाली.

घोड्यांचा षौक त्याने जबरदस्त केला. मिळालेली धनदौलत त्याने शर्यतीचे घोडे विकत घेण्यात खर्च केली. राजे-महाराजेसुद्धा करू शकणार नाहीत इतका खर्च त्याने घोड्यांवर बिनदिक्कत केला. त्याच्या तबेल्यात शर्यतीत धावणारे बावीस अस्सल घोडे त्याच्या स्वतःच्या मालकीचे होते! गवळ्याच्या दारात व्राढलेलं एक अनौरस पोर शर्यतीच्या अश्वशाळेचं मालक झालं होतं!

ही सर्व माया त्याने लेखनावर केली काय? नाही. त्याने भरमसाट कर्ज काढली नि स्वतःचे छंद मनसोक्त पुरवून घेतले. आपल्याला स्वतःच्या दारिद्र्यावर सूड उगवायचा आहे ही प्रतिज्ञा तो विसरलेला नव्हता.

ह्याच सुमाराला वॉलेसच्या जीवनात नाजूक दुःखांनी प्रवेश केला.

लेखनाच्या धांबडधिंग्यात तो पूर्णपणे रमलेला होता. इतकं लिहायचं, इतके प्रकाशक बांधायचे, इतके व्यवहार सांभाळायचे नि इतके षौक पुरवायचे तर त्याला सतत लंडनमध्येच रहाणं भाग होतं. लंडन त्याला आवडायचंसुद्धा. त्याच्या बायकोचं नाव आयव्ही. आयव्हीला ही धावपळ साफ नामंजूर होती. तिचा स्वभाव फारच शांत, धिमा आणि एकांतप्रिय होता. वॉलेसची ही पैशाची हाव तिला कळतच नव्हती. दांपत्यसुखातला विसंवाद विकोपाला जावू नये म्हणून ती एकटी समुद्र-किनाऱ्यावरल्या एका खेड्यात आपल्या मुलाबाळांना घेऊन राही. नवरा–बायकोची अधूनमधून गाठ पडे. पण जितक्यास तितकीच. वॉलेसच्या महत्वाकांक्षेशी आयव्ही समरस होऊ शकली नव्हती. वॉलेसलाही त्याचा विषाद नव्हता. दोघांची दोन भिन्न जगं होती आणि आपापल्या जगात दोघेजण सुखी होते.

ह्याचवेळी पिएर नावाच्या बेल्जियम क्रांतिकारकाचा नि वॉलेसचा स्नेहसंबंध जुळून आला. पिएरला बेल्जममधून हद्दपार करण्यात आलं होतं. लंडनमध्ये तो कसंबसं जगत होता. वॉलेसला तो आवडला व त्याने पिएरला आयव्हीबरोबरं सोबतीस राहाण्यास पाठवून दिलं. हेतू फार सरळ आणि चांगला होता. पिएर चांगला गणितज्ज्ञ होता. म्हणजे आयव्हीजवळ रहात असलेल्या मुलांना अनायासे घरचाच शिक्षकही मिळणार होता. शिवाय आयव्हीलाही बोला-चालायला एक गुणी माणूस झाला, असा सभ्य हिशोब होता. पिएर फार चांगला वागला. तो जणू कुटुंबाचाच घटक झाला. तो मुलांचा अभ्यास घेई. हवं नको पाही. पण प्रकरण एवढ्यावर थांबलं नाही. पिएरचा शांत, धीमा, परोपकारी स्वभाव आयव्हीला फार आवडू लागला. कालांतराने तिचं त्याच्यावर प्रेम बसलं. त्याचीही भावना भिन्न नव्हती.

वॉलेसवर हा वज्राघातच होता. पण त्याने दुःख गिळून संयम दाखवला. आयव्हीला विचारलं,

'तुझं नि पिएरचं अगदी अंतःकरणपूर्वक प्रेम आहे ?'

'होय.'

'तू माझ्यापासून विभक्त झाल्यावर पिएर तुझ्याशी लग्न करेल ?'

'नक्की.'

'तो तुला कधीही अंतराय देणार नाही ?'

'नाही.'

'तो तुला ममतेने जन्मभर वागवेल ?'

'हो.'

'तुमचं एकमेकांचं प्रेम आजन्म टिकेल ?'

'निश्चितपणे.'

'तुला माझ्यापासून त्रास झाला काय ?'

'त्रास खूप झाला. पण तो तुम्ही हेतूतः दिलेला नाही. खोऱ्याने पैसे मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे माझी फरफट झाली, इतकंच.'

'ह्याचा दोष कोणाकडे जातो ?'

'दैवाकडे.'

'मी तुझ्या मार्गातून आपण होऊन दूर झालो तर तू अक्षय्य सुखाला लागशील ?'

'अगदी.'

'ठीक आहे. तू सुखी हो. मी घटस्फोटाची कायदेशीर तयारी करतो.'

वॉलेसने घटस्फोट दिला. आयव्ही लग्नबंधनातून मोकळी झाली. पिएर बेल्जमला जावून येतो म्हणाला. पण तो जो गेला तो आयव्हीशी लग्न करायला परतलाच नाही! भ्रमभग्न झालेली आयव्ही स्वत: बेल्जमला गेली. तिथे तिला कळलं की पिएरचं अगोदरच दुसऱ्या बाईशी लग्न झालेलं आहे! तो पहिलं लग्न मोडू इच्छित नव्हता नि आयव्हीशी दुसरं लग्न करू शकत नव्हता. शेवटी निरुपाय होऊन सांधेमोड झालेली आयव्ही बेल्जममध्ये एकटीच दिवस मोजू लागली.

एक दिवस तिच्या छातीत दुखू लागलं. तिने वॉलेसला हाक मारली. वॉलेसने 'ओ' दिली. ताबडतोब पैसे पाठविले. दोन ऑपरेशन्स झाली. कॅन्सरचं निदान झालं. आयव्हीने डोळे मिटले. प्रकरण संपलं.

म्हणजे, अखेर एकाकी आयव्हीचं काय झालं ?/

वॉलेसचा लेखनाचा झपाटा चालूच होता. आता त्याला तसे संसारिक पाश फारसे नव्हतेच. दोन्ही मुलांची त्याने विद्यापीठात उत्तम सोय केलेली होती. त्यामुळे तो प्रपंचातून तसा मोकळा होता. पूर्वी त्याला केवळ दारिद्र्यावर सूड उगवायचा होता. आता त्याला आयुष्य मनमुराद उधळायचं होतं. पैसे उभे करायचे होते. नाटककंपनी चालवायची होती. बोलपटांची येऊ घातलेली सृष्टी जिंकायची होती. जणू गगनाला गवसणी घालायची होती.

जिम नावाची एक तरुणी प्रथम त्याचं घरकाम बघू लागली. मग विश्वास संपादन करून ती वॉलेसचे खाजगी व्यवहार बघू लागली. तिचा स्वभाव उमदा होता. पाच वर्षांच्या एकनिष्ठ सहवासाने तो सहिष्णु असल्याचंही त्याच्या ध्यानात आलं. तिलाही तो आवडू लागला. त्याला ती आवडू लागली. आता अडचण कसलीही नव्हती. त्यांनी लग्न केलं.

ह्या दुसऱ्या लग्नानंतर वॉलेसला सुखाचे खरे दिवस दिसले. जिमला बरोबर घेऊन त्याने सपाटून प्रवास केला. खर्च भरमसाट केला. पाच वर्षं त्यांच्या सुखाचे रांजण काठोकाठ भरून वाहिले.

बत्तीस साल. बोलपटाच्या नव्या युगाची चाहूल.

वॉलेस अमेरिकेत हॉलीवुडला, ती सृष्टी लेखणीने जिंकायला म्हणून एकटाच गेला. चित्रपटाचं काम सुरू झालं आणि ते चालू असतानाच त्याला अचानक घेरी आली. त्या निद्रेतून तो जागा झालाच नाही. डॉक्टर म्हणाले, 'हा लेखणीबहाद्दर अतिश्रमाचा बळी आहे!'

एडगर वॉलेसच्या अचानक मृत्यूमुळे

देणेकरी जिमच्या दारात उभे राहिले. जिमने खतावण्या उघडल्या.

नियतीनं कोणतं ताट तिच्यासमोर मांडलं होतं ?

घरकाम करणारी जिम एका लेखणी-बहाद्दराची लग्नाची बायको झाली होती. लेखकाच्या, विशेषत: यशस्वी लेखकाच्या बायकोच्या वाट्याला येणारी सारी सुखं तिने भोगली होती. आता मात्र तो लोकप्रिय पैसेवाला लेखक काळाच्या पडद्याआड झाला होता. मागे उरल्या होत्या सत्य सांगणाऱ्या हिशेबाच्या चोपड्या.

त्या चोपड्यांवरून असं दिसून आलं की, आपल्या बिनदिक्कत यथेच्छ ऐष-आरामापायी एडगर वॉलेसने आपल्या मागे सणसणीत दीड लाख पौंडांचं कर्ज ठेवून दिलं होतं ! शिवाय प्राप्तीकराचं न दिलेलं देणं लाख पौंडांचं होतं ! अधिक इतर किरकोळ देणी. म्हणजे एकूण कर्जाचा आकडा तीन लक्ष पौंडांचा होता आणि प्रकाशकांकडून येणे असलेली रक्कम फक्त सव्वीस हजार पौंड होती. वजाबाकी करता उरलेले पावणेतीन लक्ष पौंड कुठून आणायचे ?

जिमला ब्रह्म आठवलं. ह्या राक्षसी कर्जाची तीच एकमेव कायदेशीर वारस ठरली.

मात्र हा झोका क्षणिक ठरला !

चौतीस सालापासून बोलपटाचं खुळ-खुळणारं युग सुरू झालं. सिनेमावाल्यांना सनसनाटी गोष्टी हव्या होत्या. एडगर वॉलेसच्या हाणामारीच्या आणि सूड-भावनेची वेगवेगळी वळणं रंगवणाऱ्या कथा-कादंबऱ्या म्हणजे निर्मात्यांना अजब खाणीच वाटल्या. वॉलेसच्या वाङ्मयाला अचानक प्रचंड मागणी आली. एकट्या हॉलीवुडमध्येच त्याच्या गोष्टींवर आधारलेले असे एक्केचाळीस चित्रपट दणक्यात निघाले. जर्मनीत सोळा निघाले. टेलीव्हिजनने त्याच्या चाळीस कादंबऱ्यांचे हक्क विकत घेतले. वॉलेसचं तीन लक्ष पौंडांचं कर्ज बघता बघता फिटून गेलं. उलट, जिमला लाखो पौंडांची प्राप्ती झाली. आपल्या नवऱ्याची एक लक्ष पुस्तकं जगभर दर-महा खपतात हे अचाट वैभव ती पाहू शकली. पाच पौंडांच्या पगारावर लेखकाकडे घरकामाला आलेल्या जिमने 'मिसेस एडगर वॉलेस' ह्या सहीने सरकारात लाखो पौंडांचा प्राप्तीकर भरला.

पण ह्या सगळ्या पुढच्या गोष्टी झाल्या. ज्याने जिमला नियतीच्या लहरीचा चमत्कार दाखवला त्या खुद्द एडगर वॉलेसच्या पदरी नियतीने असं कितीसं सुख बांधलं होतं ? आणि त्याच्या पहिल्या बायकोची परवड काय झाली ?

● ● ●

## तापलेल्या मुंबईतली विधानसभा

पृष्ठ १४ वरून

यावर मध्येच, सल्ला कुठला, दिल्लीचा ? असे नवलकर बसल्या बसल्या म्हणाले. म्हाळगीही बसूनच हेटाळणीच्या स्वरात म्हणाले, सल्लाच घ्यायचा होता तर आधी घेता येत नव्हता वाटतं ?

याकडे सी. एम्. नी विशेष लक्ष न देता आपले निवेदन चालू ठेवले. पण विरोधकांची गडबड चालूच राहिली. गोंधळात सी. एम्. खाली बसले. सभापतींनी अचानकपणे डी. बी. पाटलांकडे वळून सांगितले, मी तुम्हाला तुमचा ठराव मांडायची परवानगी देत आहे. यावर विरोधकांनी बाके वाजवली.

गोंधळातच डी. बी. पाटील उठले आणि आपल्या भीमदेवी आवाजात 'सीमा प्रश्न' यावरचे हुकमी भाषण सुरू केले. त्याबरोबर 'आता हे बराच वेळ चालणार' अशा चेहऱ्याने बरेचसे आमदार आणि मंत्री बाहेर जाऊ लागले. सी. एम्. ही चेंबरकडे निघून गेले.

डी. बी. पाटलांच्या प्रदीर्घ भाषणात, घराघरात घुसून मारहाण करणाऱ्या पोलिसांचा निषेध होता. हातात एक-दोन कॉंटॅक्ट प्रिंट साइझचे फोटोही होते. (तसे फोटो म्हाळगींच्याही हातात दिसत होते.) बोलता बोलता फोटोवरही करीत पण कोणी बघायलाही मागितले नाहीत.

एवढे मोठे भाषण संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट ऐकायची नेहमीची सवय. पण इथे ते बसले तरी एक टाळीही पडली नाही. नंतर काँग्रेसचे शिवाजीराव पाटील बोलले. ते उठताच विरोधकांकडून आवाज आला, 'तुम्ही या बाजूला असतानाची आठवण ठेवून बोला.' यावर हशा झाला. शिवाजीराव हे पी. एस्. पी. तून काँग्रेसमध्ये गेलेले आहेत. त्यांनी भाषणात 'तिकडे' असतानाची आठवण सांगितली, की त्या वेळी महाराष्ट्र पक्षाने सत्याग्रहाचा कार्यक्रम आखला होता. पण केंद्रपक्षाची त्याला मान्यता नव्हती. इथले नेते दिल्लीत जाऊन बसले तरी परवानगी मिळेना. शेवटी वैयक्तिकरीत्या पक्ष-सदस्यांनी सत्याग्रह करण्यात यावा असा तोडगा काढण्यात आला.

यावर मृणाल गोरे उठून म्हणाल्या, हे खोटे आहे. त्यांच्या शेजारी नाना पुरोहीत होते. त्यांनी उठून सांगितले, केंद्रीय पक्ष परवानगी देईना, तेव्हा इथल्या पक्षाने आदेश धुडकावून सत्याग्रह केला.

नंतर प्रभाकर कुंटे बोलले.

ज्यामध्ये मतभेद नाहीत असा एक तरी पक्ष भारतात आहे का, असे विचारताच म्हाळगी म्हणाले, 'होय, माझा पक्ष' असे म्हणाले. त्यावर कुंटे म्हणाले, संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी आपल्या केंद्र पक्षाची 'मोठ्या विस्तारा'च्या राज्यांची कल्पना होती. तेव्हा आपली काय होती ? त्यावर म्हाळगी म्हणाले, आत्ताचे बोला. मागचे

अल्पावधीत लोकप्रिय झालेले वैशिष्टयपूर्ण सचित्र
मराठी मासिक

# योजना

( नियोजन मंडळाच्या वतीने भारत सरकारच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध होते. )

प्रसिद्धी : दरमहा दि. १ व १५

- प्रचलित आर्थिक प्रश्नांवर निर्भीड चर्चा करणारे अभ्यासूंचे लेख
- देशाच्या विविध भागांतील विकास योजनांची व प्रयत्नांची ओळख
- विविध क्षेत्रांतील सर्वसामान्य पण कर्तृत्ववान् व्यक्तींचा तसेच संस्थांचा परिचय.
- भरपूर छायाचित्रे

वार्षिक वर्गणी फक्त ५ रु., द्वैवार्षिक ९ रु., त्रैवार्षिक १२ रु.

**शिवाय**

योजनेच्या वर्गणीदारांना, प्रकाशन विभागाकडून प्रसिद्ध होणारी पुस्तकें २०% कमी किंमतीत मिळतात.

**आजच वर्गणीदार व्हा.**

संपादक, योजना,
३८, युसुफ बिल्डिंग, ४ था मजला,
वीर नरीमन रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१

कशाला काढताय ? यावर हशा झाला. शेजारी कुजबूज झाली, यांचा मतभेद होईल कशाला ? म्हैसूरमध्ये जनसंघ आहे किती ?

भाषणामध्येच ए. टी. पाटील आत आले आणि म्हणाले, मला सभागृहाला एक माहिती सांगायची आहे, की सीएम हे चेंबरमध्ये विधान परिषदेतल्या विरोधी पक्षीयांच्या घेरावमध्ये आहेत.

वर वार्ताहरांमध्ये धावपळ. आम्ही सगळेच खाली चेंबरपाशी गेलो. पण तिथे घेरावचे वातावरण दिसले नाही. सीएम्च्या रूममध्ये गप्पांचे, हसण्याचे आवाज येत होते. एक विरोधी आमदार बाहेर येताच त्यांना पत्रकारांनी घेराव केला. ते म्हणाले, आत डिस्कशन चालू आहे. ए. टी. पाटील येताना दिसले. त्यांना विचारले. ते म्हणाले, अहो, ते एक पत्रकार मला सांगत होते की, घेराव घातलाय म्हणून मी सभागृहात सांगितले. तितक्यात आतून जाडजूड अंगाचे, टक्कल आणि मिशांमधले जनसंघाचे वसंतकुमार पंडित आले. त्यांना विचारले. ते म्हणाले, ही इज इन घेराओ. ए. टी. पाटील म्हणाले, चला, मी सुटलो.

तेवढ्यात फ्लॅप डोअर ढकलून स्वत: सी. एम्. च बाहेर आले आणि सभागृहाकडे जाऊ लागले. आम्ही परत प्रेस गॅलरीत. वसंतराव नाईक उत्तर द्यायला उभे राहिले. त्यांनी एक शब्द उच्चारला नाही तोच डी. बी. पाटील उठून जोराने काही बोलू लागले. धोंगडे उठले. म्हाळगी उठले. आणखी इतरही कोणी उठले. गोंधळ झाला. सी. एम्. खाली बसले. गोंगाटातून सभापतींचा आवाज ऐकू आला की, सभा उद्या दुपारपर्यंत अॅडजर्न करण्यात आली आहे.

सर्वजण उठले. शे. का. पक्षीय मंडळी सी. एम्. भोवती जमली. हास्यविनोद सुरू झाले. त्यांच्यासह सी. एम्. चेंबरकडे निघून गेले. मागोमाग सर्व विरोधी आमदार त्याच्या खोलीत गेले. हा य- विनोद सुरू. चहाच्या कपबशांचे आवाजही ऐकू येऊ लागले.

बाहेर कळेना की, डिस्कशन आहे की घेराओ. तेवढ्यात म्हाळगी बाहेर आले. त्यांनी सांगितले, 'घेराओ जारी आहे.' ◻

चेंबरच्या दाराशी दोन साध्या वेषातले - इन्स्पेक्टर असावेत. किंवा बॉडीगार्ड. ते फक्त आमदारांनाच आत जाऊ देत. त्यामुळे आतले दृश्य बघायची इच्छा काही पुरी होत नव्हती. कोणी आमदार आत गेले की, फ्लॅप डोअर पुढे मागे होई, त्यावेळी आतले दृश्य उघडझाप करीत दिसे. दाराच्या बाजूला चार-पाच फुटांवर सी. एम्. ची खुर्ची होती. त्यांच्या टेबलाभोवतीच्या खुर्च्यांमध्ये तीस-पस्तीस आमदार बसलेले होते. सगळेजण आरामात होते. नाईकही मंद हसताना दिसत होते. दाराच्या विरुद्ध बाजूला मृणाल गोरे, प्रधान ही मंडळी दिसली. समोर दि. बा. पाटील, एन्. डी. पाटील, धोंगडे, रामभाऊ म्हाळगी ही मंडळी, तर दार आणि सी. एम्. ची खुर्ची यामध्ये

वसंतकुमार पंडित, प्रमोद नवलकर, मनोहर जोशी ही मंडळी दिसत होती.

काही वेळाने नरेंद्र तिडके आले. आत जाऊन बसले. त्यांनी 'आत्ता वरती काँग्रेस पार्टी मीटिंग आहे, त्यासाठी सी. एम्. ना सोडा' असे घेरावबाल्यांना सांगितले. घेरावबाल्यांनी नकार दिला. वसंतरावही दोनदा पार्टी मीटिंगसाठी उठले. 'मघाशी जसा मी सभागृहात जाऊन परत आलो, तसा पार्टी मीटिंगमधून पंधरा मिनिटांत परत येतो' असे सी. एम्. ने म्हटले. तरी त्यांना जाऊ देण्यात आले नाही. तिडके म्हणाले, त्यांना जाऊ द्या. नाही तर आमचे वर बसलेले लोक खाली येतील. निष्कारण क्लॅश येईल.

बाहेर पत्रकारांमध्येही गडबड चालू होती. कोणी आपल्या प्रेसला फोटोग्राफर पाठविण्याविषयी फोन करीत होते. कोणी पाचपाच मिनिटाचा रिपोर्ट आपल्या वृत्तसंस्थेकडे पाठवीत होते. शिवाय आतून बाहेर किंवा बाहेरून आत जाणाऱ्या आमदाराला घेराव करून पिळापीळ करणे चालले होतेच.

काँग्रेसचे मुंबईतील तरुण आमदार गजानन लोके आले. बाहेरून आत जाताना हसत, गप्पा मारीत गेले. तिथे तिडक्यांच्या कानाशी लागले. बाहेर आले, पत्रकारांना म्हणाले, आम्ही काही वेळ वाट पाहू. नाहीतर काऊंटर घेराओ करू.

प्रभाकर कुंटे आले. त्यांनीही मुठी वळवून पत्रकारांसमोर छोटेसे भाषण केले. सी. एम. ना घेराव करणे यांना शोभले काय! सी. एम. म्हणजे साधा-सुधा मंत्री नव्हे. तो राज्याचा मुख्य आहे. त्याच्या कामात अडथळा आम्ही कधी खपवून घेणार नाही.

शंकरराव चव्हाण (भावी मुख्य-मंत्री ?) आले आणि सी. एम. शेजारच्या त्यांच्या चेंबरमध्ये शिरले. जाताना हसून, 'बरे चाललेय' या चेहऱ्याने पत्रकारांना हात केला. घेराव-मध्ये मघा सी. एम. नी 'पंधरा मिनिटात मी परत येतो.' हे आश्वासन देताना म्हटले होते की मी कोणाचे उदाहरण देत नाही, पण मी नक्की परत येतो. यावर मोठा हशा झाला. हे सगळे, शंकरराव चव्हाण लघवीला जातो म्हणून पसार झाले होते, त्याला उद्देशून.

वरून तीन स्त्री आमदार येऊन दारासमोर उभ्या राहिल्या. विमल रांगणेकर, सौ. रामन आणि निर्मला ठोकळ. काही वेळाने त्या आत गेल्या. त्यानंतर लगेच आमदारांचा एक लोंढाच वरून येताना दिसला. गजानन लोके, राजा मिराशी, हे आघाडीवर. एक हिरो टाईप, हिरवा बुशशर्ट घातलेले अगदी पोरगेलसे आमदार लोणारीही जोरात होते. परभणीला ज्यांची गाढवा-वरून धिंड काढली ते इक्बाल होते. होशिंग होते. चलो, काऊंटर घेराओ, असे म्हणत ते आत घुसले. बरोबर मी पण आत शिरलो. कडेच्या एका खुर्चीवर उभा राहून बघू लागलो.

रांगणेकरबाई आणि त्यांच्या साथी-दारिणी मृणाल गोरेंच्या मागे जाऊन

उभ्या राहिल्या होत्या. राजा मिराशी आणि इतरांची बरीच शब्दाशब्दी चालली होती. विरोधीवाले म्हणाले, तुम्हाला काऊंटर घेराव करायचायना, करा खुशाल. आम्ही बसून राहतो. सगळ्यामधे बसलेले सी. एम. मात्र मंदसे हसत होते.

तेवढ्यात एकाने दारांतल्या वसंत कुमार पंडित यांच्या खुर्चीचे पाय मागून ओढले. त्यासरशी ते तोंडावर खाली पडले. बाजूला मनोहर जोशी होते. त्यांची तर खुर्चीच दोघांनी उचलली आणि बाजूला फेकले. हे बघताच इतर विरोधी आमदार साखळी करून काँग्रेसवाल्यांना अडवू लागले. त्यात एकाने पुढे असलेल्या म्हाळगींना बाजूला ओढले. ते खाली पडले. तिथे आडवी पडलेली खुर्ची होती म्हणून. नाहीतर ते तुडवलेच जायचे. तेवढ्यात केशवराव धोंगडे आडवे आले. तेही पडले. एकदोघांच्या लाथाही त्याना लागल्या. त्या गडबडीत चार सहा जणांनी सी. एम. भोवती कोंडाळे करून त्यांना बाहेर काढले. सगळे विरोधी लोक त्यामागे धावताच दुसऱ्या तुकडीने बाजीप्रभू स्टाईल त्यांना चेंबरमध्येच उलटे थोपवले.

आरोळ्या मारीत सी. एम. ना घेऊन आमदारांचा जमाव येवढ्या जोरात गेला की बघतच राहावे. लिफ्ट खाली आणून ठेवलेलीच होती. सी. एम. ना उचलून, त्यांची एक तंगडी धरून त्यांना लिफ्टमध्ये असे फेकण्यात आले की बस्स. अशारीतीने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची लिफ्टच्या पेटाऱ्यातून सुटका झाली. हे दृश्य पाहणारा कोणीही माणूस स्वतः सी. एम. व्हायचे मनातही आणणार नाही.

लिफ्ट वर गेली.

इकडे काही विरोधी आमदार धावत जिन्याने वर गेले. हॉलमध्ये सी. एम.चे भाषणही चालू झाले होते. बाहेर डी. बी. पाटील जोराने, हे शोभलंकाय यांना, हा लोकशाहीला कलंक आहे, म्हाळगींना मारता, जनसंघाचा झाले म्हणून काय झाले, मारायचे ? असे म्हणत होते. शे. का. प. चे हुंडे म्हणाले, मला माहीत आहे कोणी कोणी मारहाण केली. एकेकाला जोडे मारुनच दाखवतो. वसंत कुमार पंडित होते. पण बोलले नाहीत. हुंडयांचे पाकीट गेले. नवलकरांचा चष्मा गेला. पण परत मिळाला.

वरच्या आरडाओरडीला श्रोते फारसे नव्हते. सगळे खाली आले. परत विरोधीपक्षाचे दालन भरले.

म्हाळगी आले. त्यांच्या मानेजवळील दोन इंच बनियसह शर्ट फाटलेला होता. पुढे काय करायचे याची चर्चा झाली. आज झाले येवढे पुरे असे ठरले. उद्याचे रात्री ठरवू असे म्हणून सगळे आमदार निवासाकडे निघून गेले.

वरची पार्टीमिटींग संपलेली होती. सी. एम. नी मी परत घेराओमध्ये बसण्यासाठी जात आहे माझ्या मागे कोणीही आमदाराने येऊ नये असे बजावले व ते खाली येऊन चेंबरमध्ये बसले.

पण समोर फक्त उलटया पालटया पडलेल्या खुर्च्या होत्या. ◻

[ उत्तरार्ध पुढील अंकी ]

# पुणे आंतरबँक मराठी एकांकिका स्पर्धा

## दत्ता श्री. टोळ

पी. डी. ए. ही सांस्कृतिक नाट्यसंस्था. नाट्य क्षेत्रात विशेष नावाजलेली, संस्थेचे आगळे वैशिष्ट्य टिकवून असणारी. बावीस वर्षे संस्थेने रंगभूमीची निष्ठेने सेवा केली. अनेक उपक्रम राबवले. ते देखील यशस्वीरीत्या. पुण्यपत्तने आज शालेय स्तरावर नाट्यवाचन स्पर्धा ' रविवार सकाळ 'मार्फत घेतल्या जातात. त्यापूर्वीचा नटयवाचन प्रयोग पी. डी. ए. चा कॉलेज विद्यार्थ्यासाठी ' पुरुषोत्तम करंडक ' व रोटरी क्लब एकांकिका स्पर्धा आहेत. औद्योगिक क्षेत्रातही तसा उपक्रम गेली आठ वर्षे चालू आहे. पी. डी. ए. पासून विभक्त होऊन सवतासुभा स्थापन केलेल्या थिएटर अॅकडमीच्या गच्चीवरील एकांकिकांचे प्रयोग होत आहेत. तेव्हा अन्य क्षेत्रात काहीतरी नवे करावे या उद्देशाने संस्थेने ह्या वर्षी आंतरबँक एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या. अवघ्या आठ संघानी (त्यातही बँका सातच) भाग घेतला. पुण्यातील बँकांची संख्या लक्षात घेता आठ हा आकडा समाधानकारक नाही. पण स्पर्धा आयोजकांना ह्याबाबतीत योजनेसाठी पुरेसा अवधी मिळाला नाही (ही खुद्द भालबांचीच कबुली) म्हणून असे घडले. असो पुण्याच्या नाटचक्षेत्रात एका चांगल्या उपक्रमाची भर पडली हेही नसे थोडके मानून पी. डी. ए. चे अभिनंदन करून स्पर्धां कशा रंगल्या हे पाहू या.

एकोणतीस जुलै—स्पर्धांचा छोटेखानी उद्घाटन समारंभ श्री. वसंत शांताराम देसाई ह्यांच्या हस्ते पार पडला. प्रा. भालबा केळकरांनी मुंबई येथे रिझर्व्ह बँकेच्या एकांकिका स्पर्धावरून आपणांस अशा स्पर्धा घ्यावेसे वाटले हे सांगितले. अध्यक्ष श्री. देसाई यांनी कोणाचा स्पष्ट उल्लेख न करता रंगभूमीवर चांगले ' प्रयोग ' व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. बाकी उपमापास शुभेच्छा, उपमान चांगला रुजावा अशी अपेक्षा इ. भाषण झाले.

सेंट्रल बँकेची ' झपाटलेलं घर ' ही एकांकिका शुभारंभाचा प्रयोग म्हणून सादर झाली. सर्वच काही सामान्य होते. अगदी शालेय स्तरावरील नाटकाप्रमाणे वाटले. खरं तर एकांकिकेचे कथावीज मोठे चांगले आहे. परंतु कथेला नाटचरूप देताना लेखकाला त्याची बांधणी बांधे-

सूदपणे करता आली नाही. त्यामुळे ह्यातील संवाद केवळ संवाद वाटले. त्यातही पुनरावृत्ती म्हणजे कंटाळाच. दिलीप दिघे (प्रभाकर) ह्यांचे अशुद्ध उच्चार, शॅडोप्लेप्रमाणे स्त्रीचे काम करणाऱ्या स्त्री कलावंताने पुढे प्रत्यक्ष रंगमंचावर येऊन देखील तिचे नाव माहितीपत्रकात नसावे हा विनोदच म्हणायचा. ◘

'थीफ पोलिस' युनायटेड वेस्टर्नच्या प्रयोगाने मात्र मोठा दिलासा दिला. प्रायोगिक मानली जाणारी ही एकांकिका चांगली बसवण्याचा बरा प्रयत्न केला होता. परंतु सूत्रधाराप्रमाणे मध्येमध्ये डोकावणारे प्रॉडक्शन मॅनेजरमुळे रंगाचा बेरंग होत होता. रेल्वे प्रवासात एका सोसायटी लेडीची सोन्याची चेन चोरीस गेल्यानंतर डब्यात असलेल्या समाजातील वेगवेगळ्या वर्गातून आलेल्या लोकांची काय प्रतिक्रिया घडते हे विजय तेंडुलकर ह्यांनी सुरेख रंगवले आहे. कम्युनिस्ट, बेकार तरुण, नोकरीवाली मुलगी, इ. अनेक लोक त्या चोरीबद्दल कसे वेगवेगळे अर्थ-लावतात हे पहाताना आपल्यालादेखील असा अनुभव कधी आल्याचे आठवते. ह्या एकांकिकेपुरते बोलावायचे झाल्यास सर्वोत्कृष्ट काम केले पेन्शनरच्या भूमिकेतील द. वि. अटकेकर ह्यांनी. एक वृद्ध पेन्शनर, चुकून केळाच्या घडावर बसलेला त्यांनी छान उभा केला. गार्डने झडतीसाठी उठायला सांगितले असता होणारी तारांबळ, स्वमताबद्दल आग्रही भूमिका हे त्यांनी अभिनयातून सुरेख दाखवले. त्यांची वेषभूषा व अभिनय पाहून थोड्या प्रमाणात केशवराव दाते ह्यांची आठवण झाली. ◘

तीस जुलै. दिग्दर्शक लेखक ह्या दुहेरी भूमिकेत श्रीनिवास भणगे ह्यांचे नाव. एकांकिका द्विपात्री. कथावस्तु रहस्यमय. त्यामुळे कथेबद्दल उत्कंठा शेवटपर्यंत रहाणार ही अपेक्षा व तसे घडलेदेखील. एका धंदेवाईक खुनी इसमाला एका माणसाने दुसऱ्या एका खुनाची 'सुपारी' देऊन बोलावलेले असते. त्या खुनी इसमाने एक तपाहून अधिक वर्षापूर्वी त्याच जागी नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेल्या एका बालिकेवर बलात्कार करून तिचा खून केलेला असतो. मात्र खुनाचा आळ तिच्या भावावर येऊन त्याला कारावास घडलेला असतो. ह्या बेडर, उलट्या काळजाच्या त्या खऱ्या खुनीला अंगाने फाटका असलेला एक माणूस भोसकून यमसदनास पाठवतो. कारण तो फाटका माणूस त्या मुलीचा भाऊ असतो ही 'शल्य राहिले उरी' एकांकिकेची कथा. एकांकिकेला न्याय देण्याचा अविनाश देशमुख, गजानन खळदकर ह्यांनी बरा प्रयत्न केला. पण फार मोठे यश एकांकिकेला लाभावे असा प्रयोग झाला नाही. ◘

स्टेट बँकेची 'बदाम राणी चौकट गुलाम' ही पद्माकर डावरेलिखित एकांकिका अगदी बेताची झाली. विनोदी एकांकिकेला त्यातील विनोदामुळे काही अपेक्षित यश आपोआपच मिळत असते.

पण तेवढी देखील जमेची बाजू ह्या अेकांकिकेस नव्हती. पाठांतर कच्चे, पात्रांचा अभिनय साधारण, दिग्दर्शनाचा अभाव त्यामुळे सारे कसे सुमार वाटले. ह्या एकांकिकेपुरते नमूद करायचे झाल्यासअरविंद अभ्यंकर ( मार्तंडराव ) बरे वाटले. बाकीचे सगळे संवादवाचन करीत होते असेच म्हणावे लागेल. ◻

एकतीस जुलै. 'कहाणी कुणा प्रेमिकाची' ही पहिली एकांकिका बँक ऑफ इंडियाची. दोघे तरुण मित्र. एक बेकार पण जीवनाविषयी बेफिकिर असलेला. दुसरा साधा सीधा म्हणूनच प्रेम करताना देखील बिचकणारा. हा दुसरा मित्र त्याच्याच ऑफीसमधील एका पोरीवर लट्टू होतो. बिचकत, घाबरत प्रेम व्यक्त करतो. ह्या दोघा प्रेमिकांचे लग्न होत नाही. कारण पोरीची पत्रिका आड येते. ते दोघे प्रेमी जीव एकमेकांपासून दूर होतात ही साधी सिधी कहाणी तुम्हांआम्हाला नित्य पहायला, ऐकायला मिळणारी. ही कहाणी कुणी म्हातारपणी 'आम्ही-देखील एकेकाळी प्रेम केलं होतं' या न्यायाने सांगतात. ह्यातील बेकार तरुण व प्रेमी ह्या भूमिकेत अजित सातभाई व विजयदत्त गर्दे ह्यांनी मोठा रंग भरला. श्री. सातभाई आत्मविश्वासाने काम करीत होते. तर गर्दे ह्यांच्या अभिनयात सहजता आढळून आली. प्रेयसी ललिताची भूमिका सौ. प्रियवंदा जोगळेकर ह्यांनी समजून केली. ह्या सर्वांना अभिनयाची प्रशस्तीपत्रके मिळाली. सांघिक काम चांगले झाले. एकांकिकेस दुसरे पारि-तोषीक लाभले. ह्यातील उणीवा—सूत्र-धार भालचंद्र खेर प्रथम थोडे घाबरलेले वाटले. पुढे त्यांनी स्वतःला सावरले. पण अभिनयात अतिशय कृत्रिमपणा जाणवत होता. त्यांचे पाठांतरदेखील कच्चे होते दोन दृश्यात बराच वेळ जात होता हे देखील खटकले. ◻




'समोरचा नाडकर्णी' ही स्टेट बँकेने सादर केलेली एकांकिका. सव्वा डझन कलाकार ह्या एकांकिकेत होते. आपलं ते वाईट, दुसऱ्याचं ते चांगलं मानणाऱ्या एका स्त्रीला शेवटी आपलंच चांगलं आहे त्यावर समाधान मानावं हे कळतं अशी कथा एकांकिकेची आहे. यातील श्री. व सौ. बांदिवडेकरच्या भूमिकेत अरुण इनामदार व सौ. जे. देशपांडे

ह्यांचे टोनिंग ठीक नव्हते व त्यांचेच काम अधिक. त्यामुळे प्रयोग यशस्वी झाला नाही. एकांकिकेची तांत्रिक बाजू मात्र बरी वाटली. ¤

एक ऑगस्ट. स्पर्धेचा चौथा व अखेरचा दिवस. महाराष्ट्र बँकेने 'फोन करण्यापूर्वी' ही एकांकिका सादर करून महान यश मिळवले. प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषक. लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट व प्रथम क्रमांकाचा अभिनेता असा मुकुट लाभला श्रीनिवास भणगे ह्यांना. त्याच्याच जोडीला दिनूच्या-वेडयाच्या भूमिकेबद्दल राजेंद्र पोफळे ह्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी श्री. चित्तरंजन कोल्हटकर ह्यांनी विशेष पुरस्कार दिला. असे घवघवीत यश एकांकिकेला लाभले. मानसशास्त्राचा एक प्राध्यापक रणदिवे त्याची देखणी पत्नी त्याच्याच एका सहकाऱ्याशी बदफैलीपणा करते म्हणून तिचा पद्धतशीरपणे खून घडवून आणतात.

सवयीचा गुलाम असणारी व्यक्ती सवयीची चौकट मोडू शकत नाही ह्या तत्वाचा उपयोग करून खून करवला जातो, अशी ह्या एकांकिकेची कथावस्तु. तसं पाहिलं तर ही एकांकिका बरीचशी एकपात्री वाटते. प्रा. रणदिवे सोडल्यास त्यांची पत्नी, तिचा प्रियकर, खून करणारा त्यांचा वेडा भाऊ दिनू ह्यांना फारसा वाव नाही. दीर्घकाळ रणदिवे ह्यांचे निवेदन (त्यानंतर दीर्घकाळ अंधार हा मोठा दोष) नंतर अन्य पात्रांचे थोडेबहुत काम (त्याही वेळेला रणदिवेची हजेरी बहुधा असतेच) असे याचे स्वरूप-ध्वनी व प्रकाशयोजना ह्या तांत्रिक बाजूचा फार मोठा वापर होतो. ह्यात थोडी जरी चूक घडती तर एकांकिका कोसळती. परंतु श्रीनिवास भणगे ह्यांनी सर्वच बाजू भक्कमपणे पेलल्या. 'मिनांग काबाऊ' व भुकेल्या कुत्र्याची परकीय कथा याचा धागा एकांकिकेला लाभला असावा असे वाटते. पण लेखक ह्या नात्याने श्री.भणगे ह्यांनी एकांकिकेचा केलेला शेवट प्रशंसनीय आहे. आपण खून पचवला ह्यापेक्षा आपले ज्ञान जगाला लाभावे यासाठी मानसशास्त्राचा प्राध्यापक स्वतःला अटक करवून घेतो हा शेवट उल्लेखनीय आहे. तो लेखकाचा स्वतःचा वाटावा असा आहे. प्राध्यापकाची देखणी पत्नी देखण्या पुरुषावर आशुक होते यासाठी दिनेश ह्या पात्राची निवड योग्य नव्हती हे परीक्षकांचे मत. श्री. चित्तरंजन कोल्हटकर म्हणाले, 'तंत्राच्या आहारी गेलेले नाटचप्रयोग गावोगावी, खेडयातून नेता येत नाहीत' याचा लेखक-दिग्दर्शक भणगे ह्यांनी जरूर विचार करावा. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त टाळ्या मिळालेली ही एकुलती एक एकांकिका. ¤

शुद्ध भारतीय वातावरणातील 'आत्मनस्तु कामाय' ह्या बडोदा बँकेच्या एकांकिकेने स्पर्धेचा समारोप झाला. एकांकिकेस दुसरे पारितोषक लाभले. दिग्दर्शकांनी पात्रांच्या हालचाली रेखीव बसवून घेतल्या होत्या. सांघिक काम छान झाले. माणूस सदैव 'स्व' भोवती कसा जखडला आहे, आत्मप्रौढी,



'फोन करण्यापूर्वी' एकांकिकेत श्रीनिवास भणगे व राजेंद्र पोफळे

आत्मस्तुती, आत्मतत्व यात कसा गुरफटला आहे हे या एकांकिकेत दर्शवले आहे. सौ. शुभदा जोशी ह्यांना मिसेस नार्वेकरच्या भूमिकेबद्दल सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषक लाभले.

पारितोषक वितरणप्रसंगी श्री. चित्तरंजन कोल्हटकरांनी अध्यक्षीय भाषणात स्पर्धातील गुणी कलावंताना पी. डी. ए. ने संधी द्यावी, मात्र त्यासाठी वर्कशॉप नको, अशी अपेक्षा व्यक्त केली. भालबांनी परीक्षक व स्पर्धक ह्यांचा मेळावा भरवून याबाबत चर्चा घडवून



'आत्मनस्तु कामाय' एकांकिकेत सौ. शुभदा जोशी व बी. व्ही. देशपांडे

आणण्याचे व नाट्यशिबीर घण्याचे मान्य केले.

परीक्षक म्हणून श्री. व्यंकटेश माडगूळकर, श्री. शांताराम आठवले व सौ. उषा सराफ ह्यांनी चोख कामगिरी बजावली. परीक्षकीय निवेदनात स्पर्धकांनी मार्यामिगचा सोस ठेवू नये इ. सूचना होत्या. यशाइतकेच प्रयत्नही महत्वाचे असेही (हा बहुधा धाकुट्या माडगूळकरांचा दिलासा) सांगण्यात आले. असे होते आंतरबँक एकांकिकांचे स्वरूप. ● ●

# हिंदी चित्रपट

## सुभाष नाईक

# गहरी चाल

जितेन्द्र, हेमा मालिनी, अमिताभ बच्चन, बिंदू, प्रेम चोपडा हे खरे तर आजच्या हिंदी चित्रसृष्टीतील आघाडीचे कलावंत. या साऱ्यांना बरोबर घेऊन आणि अर्थातच निर्मितीवर पुरेसा खर्च करून करमणूकप्रधान हिंदी चित्रपट काढणे तसे कुणाला विशेष जड जाऊ नये. लोकप्रिय कलावंत आणि नेहमीचा हिंदी मसाला असला की साधारण हिंदी चित्रपट तयार होतो. मात्र मद्रासच्या 'चित्रालय'ला हा मसाला वापरता आलेला नाही. नावाजलेले कलावंत घेऊन आणि सर्व मसाला वापरून हाती मात्र काहीच लागत नाही.

खून, बँकेवर नाट्यमय दरोडा, अगतिक अमिताभचे बदमाशांच्या कचाट्यात सापडणे, जितेन्द्रचे जेम्स-बॉण्डटाइप आगमन, मोटारीचा पाठलाग, प्रेम करणे, प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, प्रेमात पाडणे आणि तुफान हाणामाऱ्या अशी सर्व घटक द्रव्ये असूनही रसायन मात्र जमलेले नाही.

कथेला तर कसलाही धरबंध नाही. वडिलांचे बँकेतील अफरातफरीचे प्रकरण दाबण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अमिताभचे प्रेम चोपडाच्या जाळ्यात सापडणे आणि बेकायदेशीर कामे करणे, जितेंद्र त्याचा बालमित्र, आणि सी. बी. आय. या गुप्तहेर संघटनेचा अधिकारी देखील. अमिताभची बहीण हेमामालिनी हिच्याशी जितेन्द्रचे प्रेमप्रकरण. अनेक थरारक हाणामाऱ्यांनंतर जितेन्द्रला अपराध्यांचा काटा काढण्यात यश येते. सत्यपक्षाचा जय आणि दुष्टांचा पराभव हे फॉर्म्युला—सूत्र. त्यात थोडी-फार 'चाल' आहे पण कसलीही 'गहराई' नाही. इंग्रजी चित्रपटांतील तुरळक प्रसंगांची अगदी निकृष्ट नक्कल असं काहीसं ह्याचं स्वरूप.

जितेन्द्रने नेहमीप्रमाणे म्हणजेच जुन्या सवयीप्रमाणे वेड्यावाकड्या उड्या मारल्या आहेत. हेमामालिनी दिसते फक्त आकर्षक. नटांना अभिनयाला मुळातच वाव नाही तरीदेखील अमिताभ बच्चनने व्यक्तिमत्त्वातील दुबळेपणा आपल्या अभिनयातून व्यक्त करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. लक्षात राहतो तो फक्त अमिताभचा अभिनयच. प्रेम चोप्रा आणि बिंदू यांनी नेहमीच्याच आविर्भावात आपल्या भूमिका वठवल्या आहेत. वेगळेपण काहीच नाही.

लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीतही सुमारच आहे.

हा एक फसलेला स्टंटपट आहे एवढेच !

◻

# गाय और गोरी

'हाथी मेरे साथी' आणि 'जानवर और इन्सान' या चित्रपटांच्या यशानंतर सॅण्डो एम. एम. ए. चिन्नप्पा देवर यांनी मुक्या जनावरांचे अदभुत चमत्कार दाखवणारा 'गाय और गोरी' हा चित्रपट निर्माण केला आहे. हा चित्रपट विशेषेकरून बालबुद्धीच्या प्रेक्षकांना निश्चित आवडेल असा आहे.

'गाय और गोरी'चे कथानक संपूर्णतया अदभुत चमत्कार करून दाखवणाऱ्या गायीभोवतीच गुंफलेले आहे. ही गाय खरोखरच असामान्य आहे. चित्रपट पहाताना एक मुके जनावर असे काही करू शकेल काय असा विचार मनात येणे साहजिक आहे. परंतु या चित्रपटाचे कथानक–ह्यातील काल्पनिक अवास्तवता याला महत्त्व नाही. निर्मात्यांना एक करमणूकप्रधान चित्रपट निर्माण करून जाता जाता माणसातील सुप्त अशा सत्प्रवृत्तीला आवाहन करायचे असावे. आणि ते बऱ्याच प्रमाणात साधले आहे असे वाटते. तसे पाहिले तर चित्रपटातील शक्याशक्यता बिनबुडाची आहे असे कित्येक प्रसंगातून प्रत्ययाला येते.

देवर यांनी यापूर्वी हत्ती आणि वाघ यासारखे प्राणी पडद्यावर खेळवले होते. आता त्यांनी गाय खेळवली आहे. ही गाय माणसासारखी रडते, नाचते, हसते-देखील. ही गाय बदमाशांना धडा शिकवते. रेल्वेमार्गावरील फिशप्लेटस गुंडांनी काढून टाकताच ती गुंडांना पळवून लावते. धोक्याचा लाल कंदील तोंडात धरून रेल्वे रुळावरून धावते आणि गाडी थांबवून अपघातातून वाचवते. सरकारकडून मेडलही मिळवते. वेळ येताच ती मोटारीच्या वेगाहूनही अधिक वेगाने धावते. ह्या शक्तिमान गायीचं नाव आहे 'लक्ष्मी' आणि तिची जिवाभावाची मैत्रीण आहे 'गोरी' (जया भादुरी). आपल्या या जिवाभावाच्या मैत्रिणीला ती गाय जिवावर उदार होऊन संकटातून वाचवते. अनेक जिवावरच्या प्रसंगातून वाचवते. आपल्या मैत्रिणीच्या दुःखात ही गाय सहभागी होते. अनेकदा ती आसवं ढाळते. गोरी ही खेड्यातील एक अनाथ मुलगी. तिनं लक्ष्मीला वाढवले आहे. दोघींचेही एकमेकींवर विलक्षण प्रेम... इतके की जणू दोघीही एक.. फक्त शरीरे दोन. गोरी आपल्या गायीच्या साह्यानं अनेकांना मदत करते...गावात कुणावरही कसलेही संकट आले की गाय आणि गोरी त्यांच्या सहाय्याला त्वरित धावून जातात. आपल्या प्रेमळ वागणुकीनं गोरी सगळ्या गावाचीच लाडकी लेक बनते.

परंतु ही गोरी एका श्रीमंत आणि बदफैली तरुणाच्या मोहजालात सापडते. तो तिला गटवण्याकरिता नाटक रचतो. पूर्वीच्या झाल्या अपमानाचा सूड उगविण्याकरिता तो हे सगळं करतो. गोरी 'लक्ष्मी'च्या आणि गावकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध या तरुणाशी विवाह करते. लग्नानंतर पहिल्याच रात्री गोरीला हा

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM :

# M/s. Fuel Instruments
# &
# Engineers Pvt. Ltd.,

## Ichalkaranji

Manufacturer & Exporter of
Testing Machines.

तरुण आपल्या नाटकाची कल्पना देतो आणि तिच्या छळाला प्रारंभ होतो. परंतु हा सारा छळ सहन करीत करीत ती त्या तरुणाचे मनपरिवर्तन करण्यात यशस्वी होते.

रगेल आणि रंगेल अशा या श्रीमंत तरुणाची भूमिका शत्रुघ्न सिन्हाने रुबाबात वठवली आहे. परंतु कित्येक वेळा तो अतिरेकी अभिनय करतो. अन्य कलाकारांची नक्कल करता करता वाहवत जातो. तो पात्राला शत्रुघ्न बनवतो. कधी कधी त्याची भूमिका खलनायक कम नायक अशी संमिश्र स्वरूपाची. नायक म्हणून तो लायक नाहीच पण खलनायकाच्या भूमिकेतही तो उगाच नाटकीपणामुळे यशस्वी होत नाही. जया भादुरीच्या तुलनेने तो उंचीलाही बराच जास्त वाटतो. जया भादुरीने आपली भूमिका तन्मयतेने वठविण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. (दिग्दर्शक एम. ए. तिरुमुगम यांच्या संकलन दिग्दर्शनाची चुणूक इतकीच की एका मुक्या जनावराकडून—गायीकडून—त्यांनी चांगले काम करून घेतले आहे.)

केवळ गायीचे चमत्कारच चित्रपट यशस्वी होण्यास पुरे पडतील काय याविषयी खात्री न वाटल्याने खलनायिका बिंदू आणि मनमोहन यांची पात्रे घुसवली आहेत. बिंदूची दोन उत्तान नृत्ये आणि बरोबरच तिचे शरीरप्रदर्शन...काही उत्तेजक दृश्येही... घातली आहेत. शत्रुघ्न सिन्हा असल्यानंतर हाणामारी आवश्यकच. फाइटस्च्यावेळी कॅमेरा कुशलपणे फिरवला आहे. ह्या ट्रिक्स जुन्या असल्या तरी परिणामकारक वाटल्या. बाकी गायीचे चमत्कार हाणामारी, उत्तान नृत्यदृश्ये यांच्या गर्दीशिवाय एकही प्रसंग मनाला स्पर्शून जाईल असा नाही.

लक्ष्मीकांत प्यारेलालचं संगीत निराशाजनक. एकही गीत लक्षात राहावं असं नाही.

एकूण काय तर, गायीचे अदभुत चमत्कार आणि कधी कधी माणसापेक्षाही जनावरे माणसांना चांगली ओळखू शकतात. माणूस कितीही दुष्ट असला, कठोर वाटला तरी कुठेतरी त्याच्या मनाचा एक कोपरा सतप्रवृत्त असतो. तो सुधारू शकतो हे सांगण्यासाठी देवरसाहेबांनी हा सारा खटाटोप केला आहे. बालबुद्धी प्रेक्षकांची करमणूक होईल एवढेच. ● ● ●

## तीन रात्री झोप नाही !

'प्यासा सावन' या चित्रपटात दिलीपकुमारबरोबर काम करण्याकरिता नवोदित अभिनेत्री उषा सोळंकीची निवड झाली. या चित्रपटाचा मुहूर्त झाल्यानंतर तीन रात्री तिला झोपच आली नाही. तिने सांगितले की, लहानपणापासून ती दिलीपकुमारची चाहती असून त्याच्याबरोबर काम करायला मिळणार याचा तिला अतिशय आनंद झाला. या हर्षोन्मादात ती तीन रात्री झोपली नाही.उषा सोळंकीचे वडील एक चांगले संगीतकार असून तिची आई गुजराथी रंगभूमीवरील एक चांगली कलाकार आहे.

ॲड. माधव कानिटकर
यांच्या
दैव जाणिले कुणी ?
या खळबळजनक खटल्यानंतर
श्रीकांत सिनकर
सादर करीत आहेत

# एका मृतदेहाचा प्रवास

माणूस
चित्र वार्ता पुस्तक

१ सप्टेंबर अंकात

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MAN SOO (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



यशवंत - वसंत राज्यात
फोफावलेल्या ग्रामीण
बांडगुळांवर
' माणूस 'चा
आणखी एक

# प्रहार

कहाणी
आणखी एका
' भाऊसाहेबांची '

यवतमाळ येथील
जवाहरलाल दर्डा नामक
एका बड्या प्रस्थाची.

पुढील अंकी

साप्ताहिक माणूस